ठेवूं ॥ वंदितों देवि कल्याणि हे तुलसी ॥ प्रतिपदीं महत्पुण्यदा करूं जी प्रदक्षिणा तुजसी ॥ सौभाग्य० ॥ श्रीहरिला तूं प्रिय जैसी ॥ आह्मींहि तसें स्वपतीशीं ॥ प्रिय नित्य असावें तुलसी ॥ मागतों हेंचि वरदान गे तुजशीं ॥ जरि उणें पतिप्रेमासि जिणें तें दुःखद आह्मांसी ॥ सौभाग्य० ॥

[ वरील पद्य संपण्याचे सुमारास पुराणिकबोवा येऊन '**सजयति सिं०**' वगैरे ह्मणून पुराणास सुरुवात करतात. जिजाबाई नमस्कार करून ऐकायला बसते.]

**पुराणिक**—ह्मटलं, बाळासाहेबांची स्वारी आली नाहीं. ते तर जेहेत्ते आधीं येऊन बसायचे.

**जिजाबाई**—आज कां अझुनी आला नाहीं, कोण जाणं. ( दासीस ) हिरे, जाग तिकडे दिवाणखान्यांत; शिवबा काय करतोय पहा. ह्मणावं, पुराणाला सुरुवात दिखील झाली.

**हिरा**—जी. ( जाते. )

**जिजा०**—तुह्मी आरंभ कराच. तो पाहिलात का, निरोपासरसा आत्तां धांवत येईल. कथा पुराण ह्मटलं, कीं

मग त्याला जेवण सुचायचं नाहीं, खाणं सुचायचं नाहीं, खेळणं सुचायचं नाहीं, हवा तिथें आणखी हवं तेव्हां, त्याकरितां एकटा सुद्धां जातो.

**पुराणि०**—मग बाईसाहेब, हें जेहेत्ते लक्षण कांहीं वाईट नाहीं. अहो—

( २ ) **देवद्विज यांवरतीं निष्ठा कथापुराणें जडते ॥ रामयुधिष्ठिरसम विक्रम करुं ईर्षाहि मनीं स्फुरते ॥ सुकीर्ति इहलोकीं ॥ मिळते मुक्तिहि परलोकीं ॥**

**जिजा०**—अंबाबाई करो, आन् आपण हें ह्मणतां असंच होवो.

**पुराणि०**—अहो—

( सदर ) **हा या विप्राचा ह्मणुनी जरि आशीर्वाद खराच ॥ ऋषीमुनीप्रणित ग्रंथीं या प्रसादगुणहि तसाच ॥ सुवृत्त जन व्हावें ॥ येणें उत्कर्षा यावें ॥**

**जिजाबाई**—वरं बाई, तुमच्या तोंडांत साखर पडो. खरंच सांगत्यें शास्त्रीबुवा, माझी किनई अशी फार फार

इच्छा आहे, वरं का, कीं या मेल्या अविंधांच्या तावेदारीची संवय लावून घेऊन, त्यांच्याकडन आह्माला आजवेरीं झालेल्या, आणखी अझुनी दिखील पावलोपावलीं होत असलेल्या अगणित विटंबना, आह्मी ज्या पार विसरून जात चाललों आहों, आन् आपली हक्काची स्वतंत्र राजसत्ता, ती पण हालची घालविली आहे, याचा माझ्या शिववाकडून तरी कांहीं विचार होवो.

**पुराणि०**—वाहवा, वाहवा ! अहो—

**( २ ) सांप्रत विचार जे ॥ ऐकूंही ॥ येति न पुरुष-मुखेंही ॥ परि ते नित्य असे ॥ जरि आई ॥ पढवित मुलांसि राही ॥ तरि मग उन्नतिचा ॥ तो कांहीं ॥ सुदिन दूर हो नाहीं ॥ तरि म० ॥**

—अहो, केव्हांही झालं तरी देशाच्या जेहेत्ते उद्धाराची आशा नव्या पिढीवरच ठेवणं फार चांगलं. मात्र तिला तशा प्रकारचं वळण लहानपणापासूनच जेहेत्ते लावावं लागतं. आणि चालू पिढीचा कांहीं आत्मघातक असा वर्तनक्रम असल्यास त्याचा या जेहेत्ते होतकरू पिढीला स्पर्शही असूं देतां कामा नये.

**जिजाबाई**—ह्मणूनच वरं, मी सात वरसं जरी इकडचा सहवास अंतरून वेळोवेळीं मोठ्या धोक्यांत आणि कष्टांत दूर एकीकडे माझ्या शिववाला घेऊन होत्यें तरी त्याचं मीं एक प्रकारानं कांहीं विशेष अवघड असं मानलं नाहीं. आन् माझ्या शिववामध्यें तसंच जर कांहीं पाणी दिसेल तर अझुनीदिखील मी आपल्या संसारसुखाकडे दुर्लक्ष करायला आणि साऱ्यांच्या उत्कर्षासाठीं हवीं तीं संकटं सोसायला तयार आहें.

**पुराणि॰**—अहो, मी जेहेत्ते पाहतोंच कीं—

( दिंडी ) **तेज आधिंच चमकतें क्षात्र त्यांत ॥ जपणुकीनें जरि मंद न तें होत ॥ योग्य कालीं होईल वृद्धि त्याची ॥ घालवीलचि अवकळा दुर्दशेची ॥**

—अस्तु, ह्मटलं आरंभ करतों. ( पुराणास सुरुवात. )

" गताऽध्यायाचे ठायीं जेहेत्ते कथाभाग असा झाला "
" होता कीं, अयोध्याधीश श्रीरामचंद्रप्रभु रावणादिकांचा "
" वध करून सीतेचा अंगिकार करते झाले. आणि "
" विभीषणास जेहेत्ते लंकेचें राज्य अर्पण करून सर्व "
" परिवारासह अयोध्येप्रत येते झाले."

—आतां इथून जेहत्ते उत्तरकांडास आरंभ होईल.

**जिजाबाई**—बरं शास्त्रीबुवा, मी विचारत्यें, आतां या उत्तरकांडांत ह्मटलं ह्मणजे सीतेचा त्याग होऊन तिच्या कपाळीं पुनः वनवास येणार, होय ना? हें पहा, इथपर्यंतचा कथाभाग ऐकायला मला बाई फार बरं वाटत होतं. कारण माझी स्थिति कांहींशी सीताबाईसारखीच होती ह्मणायची. ती रावणाच्या बंदींत होती, मी मोंगलांच्या कचाटींत शिवनेरीमध्यें अडकल्यें होत्यें. रामचंद्रांनीं रावणाला मारून सीतेचा बंद मोकळा केला आन् तिला अयोध्येंत आणलं, तशीच माझीही शिवनेरींतून सुटका होऊन मला इकडनं विजापुराला घेऊन येणं झालं. आतां सीताबाईसारखाच मलाही पुनः वियोगाचा कांहीं प्रसंग येणार कीं काय—

**पुराणि०**— आणि मी ह्मणतों तो जेहत्ते आलाच तर बाईसाहेब कांहीं वाईट होणार नाहीं—

**( ४ ) विरहसमय पुनरपि जरि येई ॥ मुलाच्या पराक्रमें जुळो सर्व कांहीं ॥ लव्हांकुशांच्या विक्रमेंकरूनी ॥ पुन्हा जसें जुळलें सर्व कांहीं ॥ विरह० ॥**

 गो ७-७०।

**जिजा०**—वः, तुह्मी आमच्या कथेचं एक हें रामायणच जुळीवतां आहां !

**पुराणि०**—होय. जेहेत्ते हेंही एक तसंच रामायण होणार नाहीं, ह्मणून कोणी सांगावं ! वाईसाहेव,—

**( ५ ) सुप्रसिद्ध वाल्मिकि जो तत्सम कवि कोणी जरी ॥ पुढतिं जगीं निपजुनियां रामायण हेंहि करी ॥ जगताचें अभ्युदयश्रेय तसें यासहि तें ॥ नाहीं येणार ह्मणुनि कवणाला सांगवतें ॥**

—अस्तु; "श्रोता वक्ता सावधाना भवंतु." (पुराणास आरंभ.)

( हिरा धावऱ्यां धावऱ्यां येते. )

**जिजा०**—थांवा पण. ही गडवड काय आहे वरं ? कायग हिरे ?

**हिरा**—आऊसाहेव, आऊसाहेव. आवासाहेवांची स्वारी पाय आपटीत दिवाणखान्यांतनं आत्तांच पुढल्या चौकांत गेली. संतापानं चेहरा अगदीं लाल झाला आहे !

**जिजा०**—अगवाई, आन् शिवबा कुठें आहे ?

**हिरा०**—मग मीं दिवाणखान्यांत जाऊन पाहिलं, तों वाळासाहेव एका खिडकीपाशीं खालीं मान घालून अगदीं

सचिंत उभे आहेत असं दिसलं. मी जवळ गेल्यें, पण माझ्याशीं ते अवाक्षर बोलले नाहींत कीं मजकडे त्यांनीं पाहिलंही नाहीं.

**जिजा०**—छे बाई, परवां एकदां इथले कोणी कसाई एका गाईचे हाल करतांना वाटेंत याच्या दृष्टीस पडले; त्यावरून त्यांच्याशीं मारामारी करून यानं अशीच एक कटकट घरीं आणली होती. आज आणखी हें काय आहे कोण जाणं. हें पहा शास्त्रीबुवा, आतां राहूं द्या पुराण. इकडचा स्वभाव रागीट, याचाही हट्टी. तेव्हां लौकर समजूत करून त्याला इकडे घेऊन यायला होईलसं दिसत नाहीं. दुपारींच वसूं आज.

**पुराणि०**—तरी वरं. मी पण आबासाहेबांकडे जाऊन, पहातों जेहेत्ते काय झालं तें. ( जातो. )

**जिजा०**—चल बाई, पाहूं दे कुणीकडे आहे तो.

( जातात. )

---

[ **प्रवेश २ रा**—**स्थळ**—दिवाणखाना. **पात्रें**—शिवाजी खिडकीपाशीं सचिंत उभा आहे. जिजाबाई व हिरा येतात.]

**जिजा०**—कारे, असा कां उभा ? अरे बोलत कां

नाहींस ? काय झालं ? तिकडनं राग का भरायचं ? तूं तसंच कांहीं केलं असशील.

**शिवा०**—आई,—

( ६ ) **चुकतों मी खराच जरि कांहीं ॥ पत्करितों निमूट शिक्षाही ॥ अपराधचि सुधारतों आई ॥....**

**जिजा०**—आहेसच तसा तूं समजूतदार मुलगा.

**शिवा०**—

**....परि करितों जरि विचार न कळे चुकतों मी काय तें ॥ तिकडे तर ते समजति बहु मीं अवगणिलें त्यांतें ॥ किति तरि संताप त्यां येई ॥ चुकतों मी० ॥**

—बरं आई, तूंच सांग, कीं प्रल्हादानं आपल्या बापाचं ह्मणणं ऐकलं नाहीं, यांत त्यानं बापाची अवज्ञा केली, असं झालं होतं कायग ?

**जिजा०**—तसं असतं तर त्या प्रल्हादावर देवाचा प्रसाद होताच ना. साऱ्या जगाचा मायबाप जो परमेश्वर त्याला आपल्या आईबापांची अवज्ञा करणारा मुलगा प्रिय

होईल कसा ? बरं पण कायरे, असा अगदीं हिरण्यकशि-पूचाच दाखला देण्यासारखं तें तुला तिकडनं भलतं सलतं काय सांगण होत आहे ?

**शिवा०**—अग भलतं नव्हे तर काय ? हं बघ—

**( ७ ) समजावें मीं शत्रु जयां शिकविशि तूं मातें ॥ ह्मणती बाबा मान तूं अग अन्नदाते ते ॥ घावा ह्मणसी पाय मीं छातीवर ज्यांच्या ॥ बाबा सांगति जाउनी पड पायां त्यांच्या ॥ स्वधर्मविध्वंसक गणुनी ज्यांची मान चिरूं ॥ मीच त्यांपुढें मान कां अपुली नम्र करूं ॥**

**जिजा०**—ह्मणजे, तुला आज आपल्याबरोबर दरबा-रांत नेऊन बादशाहाला भेटवण्याचा विचार आहे वाटतं.

**शिवा०**—होय. आणि बादशाहाच्या मेहेरबानीनं या विजापूरच्या दौलतींत मलाही एखादी असामी लावून देणार आहेत. झालं; एकदां ही ताबेदारी पत्करिली, कीं आई—

**( ८ ) उत्कर्षाची सीमा अमुची मनसब-दारी मिळवावी ॥ विशेष आलों कामीं तर मग 'राजे' ही शुष्कचि पदवी ॥ सत्तावैभववृद्धि**

 नी ९२० / १

**करूं मग यवनांची हा परमार्थ ॥ स्वदेशबंधुहि गुलाम बनवूं हाच काय तो पुरुषार्थ ॥**

**जिजा०**—बाळा शिवबा, तुझे इतक्यांतच एवढे प्रगल्भ विचार पाहून, खरोखर माझा जो कांहीं हेतु आहे तो एक झाला तर तुझ्याच हातून पूर्ण होईल, असा मला आतां पक्का भरंवसा वाटूं लागला आहे. चल, मीच तुजकरतां तिकडे दोन गोष्टी सांगून पहात्यें.

**हिरा**—ती पहा, स्वारी इकडेच येत आहे. अगबाई, पण अझुनी राग कांहीं गेला आहेसा दिसत नाहीं !

**जिजा०**—असूं दे. ( शिवाजीस ) हें बघ. तूं किंनई आतां अगदीं चिप्. कांहीं बोलूं नकोस.

( शहाजी येतो. )

**शहाजी**—(रागानें शिवाजीस )—बोल ? काय मग तुझा विचार झाला ? मजबराबर आज दरबारांत येशील ना?

**जिजा०**—( पुढें होऊन )—पण मी ह्मणत्यें, आजच इतका अगदीं आग्रह तो कां धरला आहे ?

**शहाजी**—बस्स. तूं अगदीं मध्यें येऊं नकोस. हा असा बिघडायला सारी कारण तूं ! अग—

**(९) कोण आपण काय ही स्थिति भों-वतीं नच पाहतां ॥ मागचा पुढचा विचारहि कांहिं एक न जाणतां ॥ वागणें विपरीत हें जरि पोर ह्मणुनी चाललें ॥ खास लाविल तें गळां अमुच्या रसायण चांगलें ॥**

—याकरितां मला आतांच याचा बंदोबस्त केला पाहिजे. आणि त्याचा पहिला उपाय ह्मणजे हाच, कीं याला या-पुढें तुझा सहवास बिलकुल बंद करून नेहमीं दरबारी मं-डळींत नेऊन ठेवायचा.

**जिजा०**—पण माझ्या बाळावर एवढा हा सारा गह-जब त्याच्या असल्या स्वतंत्र विचारामुळें आपल्याला पीडा होईल याच ना भीतीनं पण ?

**शहाजी**—अग, या अदीलशाहीमध्यें नुकतीच आ-मची कुठें इभ्रत आणि दौलत वाढत चालली आहे. तिला तर यापासून धोका येईलच; पण आणखी अशानं आपलं कूळ देखील बुडेल! तुला काय सांगू* इतके दिवस र-

* (धनाक्षरी) आजवरि कसाइ बघुन ॥ पित्त जातसे चढून ॥ आतां हा ह्मणत यवन ॥ शत्रु आपुले ॥ बादशहाला

ल्यानें कसायांचीं घरं पाहूनच याचं पित्त खवळे; पण आतां ह्मणतो कीं मी यवनाला भुईला हात लावून मुजराच करणार नाहीं. बादशाहाचे पदरीं राहून त्याचेविरुद्ध असले विचार बाळगल्यानं निर्वाह कसा लागतो बरं? आपण बादशाही अन्न खातों तेव्हां त्यांजवरच अशी कंबरबंदी करू पाहणं चांगलं काय ?

**जिजा०**—मग मी ह्मणत्यें ज्याचे असे बादशाहीविरुद्ध विचार असतील त्याला बादशाहाचे पदरीं बळं गोवून तें तसलं मिंधेपणाचं अन्न खायला लावूं नये ह्मणजे झालं.

**शहाजी**—तर मग आह्मीं आजपर्यंत मोठ्या तोलदारीनं कमावलेल्या लौकिकाची पुढें वृद्धि राहिलीच, पण आजलाच त्याची वाट काय होणार बरं ?

**जिजा०**—माझ्या शिववाकडून याच्या शतपट पुढें आपला लौकिक वाढेल अशी जरी मला आशा आहे, तरी पण आपल्या लौकिकांत कमीपणा त्याजकडन येऊं न देण्याची हमी पाहिजे तर आज मी घेत्यें.

**शहा०**—याचा अर्थ मला इतकाच दिसतो, कीं तुह्मीं

---

लवून ॥ ह्मणतो मुजरा न करिन ॥ यवनांच्या पदरिं असुन ॥ काय उचित हें ॥

दोघांनींही हें वेड आपल्या मनांत पक्केंच वाळगून ठेव-ण्याचा निश्चय केला आहे.

**जिजा०**—हें पहा, आपण याला वेड ह्मणा कीं कांहीं ह्मणा, पण यवन तितका मला दुस्मान् वाटतो हें मात्र अगदीं खरं आहे. या मेल्यांच्या आगळिकीच तशा. निझामशाईवर दिल्लीवाले चालून आले त्या वेळच्याच गोष्टींचं स्मरण करावं ह्मणजे झालं. आपण निझामशाईकरतां सहा महिने मोंगलांशीं लढून त्या पातशाहितीचं इमानानं रक्षण केलंत, पण अखेरीला मेले दोघे दाढीवाले एक होऊन तोंडघशीं आपल्याला पडावं लागलं होय ना? पुढं तसल्या वेमानांचा संबंध तोडून आपण इकडे विजापुरास आलांत, तेव्हां जणुं काय त्यांनीं आपल्या नीच स्वभावाची कमालच दाखवण्याकरतां, इकडच्या द्वेषानं मागं आमचे जे हाल आणि अपमान केले ते तर कधींच मी विसरणार नाहीं. माझ्या चाळावर तर मेले कसे गिधाडासारखे टपून बसले होते. या किल्ल्यांतन त्या किल्ल्यांत असं त्याला बचावतां बचावतां माझे जे हाल झाले आणि ज्या एकेक विपत्ति मला सोसाव्या लागल्या, त्यांचं स्मरण झालं कीं सर्वांगाचा कसा भडका होऊन जातो! मी ह्मणत्यें कीं आपल्या स्वतांच्या ह्मणून ह्या एक आग-

ळिकी असोतच; पण आपल्या या सर्व देशावरच जो कह्र यांनीं चालवला आहे तो काय कमी संताप उत्पन्न करण्यासारखा आहे ? खरं ह्मटलं असतां त्याच्याच तर कैवारानं आपलं अंत:करण नेहमीं जळत राहिलं पाहिजे. अहो, एक वेळ या ठिकाणीं स्वतंत्र राजसत्ता भोगीत असलेल्या कुळांत माझा जन्म आहे, त्या अर्थी या भूमीच्या ह्मणजे पर्यायानं आपल्याच लेंकरांची ही विटंबना कशी सहन व्हावी ? त्यांच्या कंसाला धक्का तो या जीवाला मानला तरच या थोरवीचं खरं सार्थक आहे. नाहींपेक्षां देवस्थानांचा उच्छेद, गाईब्राह्मणांचे हाल, हिंदुत्वाचा नाश, अवलांची विटंबना, रयतेची दैना—छे:, तें कांहीं नाहीं. या सर्व अनर्थांचं कारण जेवढे मेले हे यवन त्यांचा पुरता सत्यानास झालेला मी पाहीन तेव्हांच हा माझा त्वेष—अंहं:, आपण ज्याला वेड ह्मणतां तें वेड—माझ्या मनांतन जाईल. समजलं ?

**शहाजी**—असं आहे तर तुह्मी दोघंही कांहीं आतां ह्या ठिकाणीं राह्यला योग्य नाहीं; तिकडे पुण्याकडे जाऊन आपलं हें वेड तिथें खुशाल पिकवीत वसा. चला एकदम तयारी करा.—

**( १० ) वस्स, इथुन निघुन तुह्मि जा जा ॥ वस्स इ० ॥ उपद्व्यापि बहु चिरंजीव हे ॥ भर देणाऱ्या तयास तुह्मी ॥ इथुन निघुन० ॥**

( रागानें निघून जातो. )

**जिजा०**—( आपल्याशीं ) अगवाई, या थरावर गोष्ट आलीच का ही !

**शिवा०**—( पुढें होऊन आईस )—वरं झालं ग आई; तूं नको याबद्दल वाईट वाटूं देऊंस. बावा मला उपद्व्यापी ह्मणतात ना, तर आपण तिकडे पुण्याकडे जाऊन आतां असे एकेक उपद्व्याप करूं कीं त्यांच्या योगानं ह्या दक्षिणेंतल्या साऱ्या पातशाह्या पालथ्या पडतील !

**जिजा०**—( आपल्याशीं ) शंभुमहादेव आणि आई तुळजाभवानी माझ्या बाळाचे हे शब्द खरे करो !

**हिरा**—आऊसाहेब, खचित असं होईल हो.

**शिवा०**—आई चलच तूं. बावा ह्मणताहेत तर आपण सुद्धां आजच्या आज निघण्याची तयारी करूं. नाहीं तरी इथं राहून कोणताही विचार जमायचा नाहींच. कारण—

(अनुष्टुप्) **'हांजी जीहां' त आयुष्य द-**

 नं. १८७

**वीरीं सर्व जातसे ॥ स्वातंत्र्य न विचारींही आचारांतचि तें कसें ॥**

**जिजा०**—बाळा, पहा वरं, आतां या बाजूस कीं त्या बाजूस, पण निश्चयानं पाऊल टाकण्याचा हाच प्रसंग आहे. नीट विचार कर. अझुनी अवकाश आहे. तिकडल्या मर्जीप्रमाणं इथं राहून वागलास तर एक प्रकारानं चांगला सुखांत राहशील.

**शिवा०**—पण तें या लाचार गुलामगिरींतच ना ?

**जिजा०**—अरे पण आतां जो मार्ग तूं धरूं पाहतो आहेस तो परिणामीं कसाही कल्याणकारकच असला तरी आज त्यांत हाल, कष्ट, वनवास, एकेक जिवावरचे भयंकर प्रसंग हेच मला दिसताहेत बघ.

**शिवा०**—बेहेत्तर आहे, वाटेल ते प्रसंग येवोत, तुझ्या आशीर्वादानं आणि जगदंबेच्या कृपेनं त्या सर्वांना तोंड देईन; पण तूं शिकवलेल्या त्याच स्वतंत्रतेच्या मार्गान जाईन. आई, धर्मावर निष्ठा, देशाचा अभिमान, स्वातंत्र्याविषयीं आवड, असलं एकेक बाळकडू तुझ्या हातानं या देहामध्यें मुरलं असल्यामुळें त्याला आतां कशाही प्रसंगांची बाधा कधीं तरी होईल काय ?

**जिजा०**—शाबास बाळा. असा तुझा निश्चय असेल, तर चल, मी दिखील तुझ्या या योग्य उमेदीसाठीं आपल्या संसारसुखावर ही पहा पाणी सोडायला तयार झाल्यें. हिरे, लागा ग निघण्याच्या तयारीला.

**शिवा०**—आई, बाबांच्या रागाबद्दल तूं मुळींच काळजी करूं नकोस. हें पहा—

(११) **दाखवून राग आज दूर धाडिती ॥ कौतुकेंच तेच आइ खास भेटती ॥ आज मी कुपुत्रसाच त्यांस भासतों ॥ वंशदीप त्यांकडून खास ह्मणवितों ॥**

( जातात. दुसऱ्या बाजूनं त्याच ठिकाणीं शहाजी, दादोजीकोंडदेव व पुराणिकबोवा येतात.)

**पुराणि०**—एवंच, आपला हा निश्चय जेहेत्ते अगदीं कायमच ह्मणायचा !

**शहाजी**—अगदीं कायम. यांत तर बदल होणार नाहींच; उलटें या दादोजींनाही त्यांचे बरोबर आजच परत पाठवायचें हें आणखी वरतीं जास्त ठरलं आहे.

**दादोजी**—बरं आहे. आणलेल्या वसुलाचा हिशेब आपले कारकुनापाशीं देऊन मी ह्या निघण्याची तयारी करितों.

**शहाजी**—होय. कराच तसं. मुलीं तुमच्याच तर देखरेखीखालीं ही मंडळी मी तिकडे ठेवणार आहें. तुह्मी आमच्या अति विश्वासाचे, फार दिसांचे जुने नोकर, अनुभवी व विचारी ह्मणून तुमच्या नाव्यांत तीं असावींत असा माझा विचार आहे. या शास्त्रीबोवांना सुद्धां जा बरोबर घेऊन. कां शास्त्रीबोवा!

**पुराणि०**—व:, जेहेत्ते अति उत्तम. बाळासाहेबांसारख्या पूर्ण भाविक श्रोत्यांपुढें अहर्निश पुराण जेहेत्ते सांगायला मिळावं अशी कोण इच्छा धरणार नाहीं?

**शहाजी**—मला त्या पोराचीं लक्षणं कांहीं वेगळींच दिसतात. अद्याप तीं अमुकच असा जरी कांहीं निश्चय नाहीं व ह्मणून मी रागानं त्यांचा तिरस्कारही दाखवतों; तरी कदाचित् मागं आमच्या वडलांना शंभुमहादेवाचा दृष्टान्त झालेला आहे त्याचा हा प्रादुर्भाव नसेल कशावरून? ह्मणूनच तर त्या पोराच्या वृत्तीला थोडंसं मोकळेपणानं पण योग्य देखरेखीखालीं दूर एकीकडे जरा उदयास येऊं द्यावं असं माझ्या मनानं घेतलं आहे. आणि त्याकरतांच ही सर्व योजना आहे. ऐकलंत दादोजी—

(साकी) **दिसतिल गुण जे तुह्मां चांगले**

**उत्तेजन त्यां द्यावें ॥ अवगुण वघतां उपदे-शुनि वा शिक्षुनि ही सुधरावें ॥ जपुनि असें त्याला ॥ लावा उत्तम मार्गाला ॥**

**दादोजी**—जेणेंकरून आपल्या कुळाचा लौकिक वाढेल असंच त्यांना वागायला शिकवूं.

**शहाजी**—ऐकलंत शास्त्रीबोवा, आह्मी बादशाही ताबेदार पडलों. त्यामुळं तो ज्या रीतीनं इथं वागेन ह्मणतो किंवा ज्या तऱ्हेचे त्याचे विचार दिसताहेत त्या तऱ्हेनं त्याला आमचेपाशीं ठेवून निभाव कसा लागावा बरं? अशानं आह्मी सरकारचाकरीस चोर होऊं.

**पुराणि०**—सत्य आहे.—

(१२) **कठिण राजसेवा मानधना ॥ राजसेवा मान० ॥ गमन जसें तें असिधारावनीं॥ दुष्कर अतितर कीं जाणा ॥ कठिण राज० ॥**
—तेव्हां आपण जो विचार योजला आहे, तोच जेहेत्ते योग्य होय.

**शहाजी**—वडील या नात्यानं त्याच्यासंबंधाच्या बहुतेक कर्तव्यांतून आह्मी सुटलों आहों. जन्मापासून बरींच वर्षं जरी तो दूर होता, तरी कांहीं दिवस त्याला

इथें जवळ आणून त्याचं लग्नही करून दिलं. आतां तो आहे आणि त्याचं नशीव आहे. आमच्या विचाराप्रमाणं दौलतीचा आटोप करून दरवार संभाळला तर आमच्यासारखाच तोलदारीनं राहील. नाहींपेक्षां त्याचं विपरीत मनोगत दिसतं आहे, तें त्याला वेळेस आमच्याहूनही विशेष वैभवाला चढवील किंवा सपशेल खालीं पाडून आमच्यासुद्धां सर्वांस रसातळाला नेईल! काय जगदंवा करील तें खरं.

**पुराणि०**— अहो पण—

(१३) **कां अनिष्टशंका अशी आणितां मनांत तरी हो ॥ ईश्वरी कृपा असे तुमच्या कुळावरी ॥ उत्कर्षाचि खचित पहा आपुला सदां करी हो ॥ कां अ० ॥**

—हें पहा, वाळासाहेवांच्या आंगांतलं तेज कांहीं सामान्य दिसत नाहीं. जेहेत्ते यवनांविषयीं भाषण नि-घालं कीं कांहीं देवतासंचार झाल्याप्रमाणं त्यांची स्थिति होऊन प्रौढ व अनुभवी माणसास सुचायच्या नाहींत अशा मोठमोठ्या गोष्टी ते जेहेत्ते वोलूं लागतात. ईश्वरी योगायोग अचिंत्य आहेत. ते जेहेत्ते कुणीं सांगावेत ?

**दादोजी**—खरं ह्मणतां आपण शास्त्रीवुवा.

**शहाजी**—फार उत्तम आहे. तर मग तुमच्या ताब्यांत त्याला ठेवून मी अगदीं निश्चिंत राहीन.

**दादोजी**—आपण त्यांचेबद्दल मुळींच काळजी करूं नये. त्यांच्या पाठवणीच्या तयारीला लागावें. हल्लीं पुण्याकडील आपल्या जहागिरीची व्यवस्था फारच उत्तम आहे. मावळे लोकांस वेळोवेळीं तगाया देऊन आणि अतिवृष्टि किंवा अनावृष्टि अशा वेळीं त्यांना वरतीं आणि धडीपगडीही पुरवून तिकडील आपली रयत कशी आबाद ठेविली आहे. आपली तशी आज्ञाच होती कीं, बादशाही नोकरी म्हणजे शुद्ध अळवावरचं पाणी; तेव्हां तूर्त चलतीचे दिवस आहेत तों दोन रुपये वसूल नाहीं आला तरी पुरवला, पण प्रसंगीं उपयोगी पडेल अशी तिकडे व्यवस्था मात्र चांगली ठेवावी. त्याप्रमाणेंच सर्व केलं आहे. प्रांतांत लांडग्यांचा उपद्रव भारी होता तो बक्षिसें लावून नाहींसा केला, रानें तोडून लागवड वाढविली, आणि वसूल उत्तरोत्तर जास्त येईल व रयत तो सुखानं देईल असं केलं आहे.

**शहाजी**—वाहवा. या तुमच्या कामगिरीचं योग्य इनाम तुह्माला खचित मिळेल.

**दादोजी**—आपली मेहेरबानी व विश्वास मजवर आहे तेंच मी मोठं इनाम समजतों. आमचं काय आतां. आह्मी पिकलीं पानं. काय आयुष्याचे चार दिवस उरले असतील ते ईश्वरानं अशाच इमानी चाकरींत घालवावे झालं. मागं पोरांबाळांची काळजी थोडीच करायची आहे !

**पुराणि०**—अहो,—

(अंजनीगीत) **स्वामीनिष्ठा जी ही तुमची ॥ होइल संततिला लाभाची ॥ तिनें मात्र यां सहजसिद्धिची ॥ न करावी माती ॥**

**शहाजी**—खरं आहे तें.

( चाकर येऊन मुजरा करतो. )

**शहाजी**—( चाकरास ) कायरे, मघां देवडीवर वजावल्याप्रमाणं निघण्याची तयारी करण्याला त्या त्या मासांना ताकीद केलीस ?

**चाकर**—समदं तयारीला लागल्याती. पन ह्यो येक लखुटा दिवाणसायबासनं हुजऱ्या घेऊन आलाया.

**शहाजी**—आण पाहूं. ( पत्र वाचून ) वाहवा ! हें फार चांगलं झालं ह्मणायचं. ( दादोजीस ) वेदनूर प्रांताकडे कांहीं बखेडा उत्पन्न झाला आहे. तेव्हां तो मोडण्याकरितां

आमची एकदम तिकडे रवानगी करून देण्याचा हुजूरचा विचार ठरून तो बादशाही हुकूम दिवाण मुरारपंतांनीं हा पाठविला आहे. ठीक आहे. तुमची इथून आज पुण्याकडे रवानगी झाली, कीं आह्मीही उद्यां मग तिकडे कुच करतों. चला. उभयतांनाही या अकल्पित ताटातुटीचं विशेष अवघड वाटायला नको.

**पुराणि०**—खरं आहे. वाहवा !—

(१४) **वियोग हा खरा परी सुयोग कीं ह्मणा ॥ एका कर्तव्य दूर ने ईर्षा दुसऱ्यास ॥ होउनी कृतार्थ भेटतील ते पुन्हा ॥ वियो०॥**

( पडदा पडतो. )

---

## अंक दुसरा.

(प्रवेश १ ला—**स्थळ,** जावळीनजीक पाणवठ्याचा रस्ता)

**हिरा** ( डोक्यावर पाण्याचा हांडा घेऊन येते )—

**हैबती** ( तिला आडवून )—

(१) **कशि पाहुं जाशिल तूं तर आतां चुकवुनि गे मजला ॥ अडवी गोपिंस कृष्ण**

**जसा त्या जातां यमुनेला ॥ तशि तूतें ॥ धरुं हातें ॥ ............**

**हिरा** ( झिडकारून )—

**............व्हा परतें ॥**

**हैवती**—

**.... कशि पाहुं जाशिल तूं तर आतां० ॥**

**हिरा**—हं, माझ्या वाटेला जायचं नाहीं सांगत्यें. हा काय मेला चावटपणा ?

**हैव०**—वाहवाग, हा चावटपणा का ? हा शृंगार !

( २ ) **शृंगार ह्मणावा याला ग ॥ प्रिय अपुलें जें माणुस असतें ॥ भेटल्यास एकांतीं जरि तें ॥ सहज विशेषचि सलगी होते ॥ नाहिं तुझा मी केला ग ॥ उपमर्द ३ ॥ उपमर्द नसे हा झाला ग ॥ शृंगार ३ ॥**

**हिरा**—मला नाहीं ठाऊक शृंगार नि विंगार. हे तमाशांतले चाळे तिकडे चावडीपुढेंच बरें.

**हैव०**—तिकडे ते नुसते दाखवायचे; पण त्यांचा उपयोग खरा ह्मंजे तूं—

**हिरा**—पुरे. आतांशा एवढाच उद्योग राह्यलाहे वाटतं.—

( ३ ) **कुस्त्या झुंजा टकरा ऐसे मर्दपणाचे खेळ वरे ते ॥ दिले टाकुनी वाटतसे मज तुह्मी आतां सारेही ते ॥ नाचतमाशे रागरंग हे दंग यांमधें होण्याचा हो ॥ छंद लागला दिसतो आतां ढंग बायकी करण्याचा हो ॥**

**हैब०**—अग यांत तर सारी गंमत. कसा राजासारखा चैनींत असतों बघ. आपलं ठरल्याप्रमाणं एकदा लगीन होऊं दे, मग तुलाही अशा चैनींत ठेवीन कीं हां—

(लावणी) **संसाराचे कष्ट न तुजला पडतील ते कांहीं ॥ ठेवुन देइन सखे तुला जणुं फुलांमध्यें पाहीं ॥ आनंदानें राहुनि दवडूं दिवस खुशालींत ॥ चैन मजा यांवीण नसावें दुसरें माहीत ॥**

**हिरा**—पण मी असल्या चैनीची इतकी आज भुकेली नाहींच.

**हैब०**—मग का अझून असे दासीपणांतच दिवस घालवणार तूं ?

**हिरा**—होय. आपल्यासारखे ओंठावर चांगले मिशा वाळगणारे पुरुष जर यवनांच्या गुलामगिरींत खुशाल चैन मानताहेत, तर मला वायकोला दासीपणाची ती लाज कशाला पाहिजे ?

**हैब०**— ( आपल्याशीं ) या खेपेस इचा रोख कांहीं वेगळा आहे. चंद्रराव मोरे ज्याबद्दल नेहमीं ह्मणत असतात तें हें पुण्याकडचं फितुरी पाणी दिसतं. ( उघड ) अग, यवन ह्मणजे तूं काय समजली आहेस ! आजकाल ते वादशाही लोक आहेत वादशाही !

**हिरा**—खरंच, ते वादशाही आन् तुह्मी कोण ? चोर, गुलाम, होय ना ? अशांच्या हातनं मी दासीपणांतून मुक्त होऊन ह्मणे राणीचं ऐश्वर्य भोगणार ! ( हात ओंवाळून ) अहाहाहा !

**हैब०**—( आपल्याशीं ) छे, हा रोख वदललाच पाहिजे. ( उघड ) तर काय, तुझा माझा ठरलेला वेत मोडून एखाद्या खानमियाच्या पडदपोशींत शिरायचा तुझा विचार आहे, होय ?

**हिरा**—सांगत्यें ना, कीं तुमच्यावरावर असला ल-टका राणीपणा मिरवण्यापेक्षां त्या खानमियांच्या दाढ्या उ-पटून त्यांच्या हातीं द्यायला तयार झालेल्या, आमच्या शिवाजी महाराजांच्या घरचीं दासीच मी जल्मभर रा-हीन ! समजलात.

**हैब०**—हें बघ, तुझ्या त्या शिवाजीचं नांव मात्र या जावळींत असं काढूं नकोस आं. कुणी ऐकलं तर तुझं न माझं बरावरच डोचकं उडवतील. आमचे रावमोरे त्याला कसं पाण्यांत पाहतात बघ.

**हिरा**—हंः, तसं असलं तर त्यांचीही तळी लौकरच भरली ह्मणून समजावं. आमच्या महाराजांनीं निश्चयच केला आहे, कीं यवनांच्या छातीवर नाचण्याच्या कामांत त्यांना जे जे ह्मणून आड येतील, ते मग आपले सगे सो-यरे कुणीही असले तरी त्यांची परवा करायची नाहीं. ते बाजी मोहिते, त्यांचे मामा; पण परवां त्यांचीदिखील ग-ठडी वळून दिलें त्यांना विजापुराकडे लावून !

**हैब०**—अग पण इथें रावमोऱ्यांशीं गांठ आहे, राव-मोऱ्यांशीं. विजापुरवालेदिखील यांना वचकतात अशी बाकी असामी ही.

**हिरा०**—आन् आमचे महाराजही कांहीं कमी खंबीर नाहींत. त्यांचे उगीच दोन मावळे गडी येतील तर राव-मोरे होते कीं नव्हते करून टाकतील. त्या गोष्टी कशाला?

**हैब०**—राहुं दे कीं. इथें तरी आपल्या लग्नाच्या सो-डून त्या कुणा लेकाला पाहिजेत ! कसं मग, आतां तरी आपलं लग्नाचं ठरवून तूं इथें राहणार का फिरून पुण्यास जाणार ? आपण तर निश्चयच केला आहे, कीं किती दि-वस वाट पहावी लागो, लग्न करूं तर तें एक तुझ्याशींच.

**हिरा**—आन् मीही पण निश्चयानंच तुह्माला सांगत्यें कीं, चांगले मर्द असून आईबापांच्याच जीवावर असं भा गुबाईपणांत दिवस घालवीत इथं पडायचं असलं तर मी कांहीं तुमच्याशीं लगीन करणार नाहीं. वाटलं तर जन्म-भर तश्शी राहीन !

**हैब०**—( आपल्याशीं ) ही फिरून पहिल्या रंगावर आली. ( उघड ) बरं मग तुझ्या मनांत तरी आहे काय तें एकदां स्पष्ट कळूं दे कसं ?

**हिरा०**—हें पहा माझ्या मनांत असं आहे कीं, आ-मचे जसे तानाजी, हिरोजी, नेताजी, येसाजी, झालं ह्मटलं तर ते संभाजी कावजी, असे एकेक मराठे मावळे गडी

आमच्या महाराजांस मदत होऊन आज हळुहळु स्वपराक्रमानं मोठ्या इभ्रतीला येत चालले आहेत. तसंच तुह्मीही त्यांच्यासाठीं मर्दुमकी गाजवून हजारी, पंचहजारी, सरनोवत असं कांहीं तरी व्हावं, आन् मग मोठ्या थाटानं माझ्याशीं लगीन करावं.

हैब०—असं असं. सरनोवतीण होण्याची हौस आहे तुला होय? अग पण आह्मी जावळींतलीं रावमोऱ्याचीं माणसं; तुझे महाराज आह्माला जवळ करतात कशाला. तिथें आलों ह्मंजे आयतंच धरून वड्याचं तेल वांग्यावर काढतील झालं!

हिरा—छे छे छे. आमचे महाराज किती आर्तवंत, मनुष्याचे भुकेले आहेत. आले मनुष्यांचा संग्रह करितात आणि योग्यता पाहून त्यांना वाढवतात. परवां आठशें पठाण बेरोजगार होऊन दौलताबादेहून आले, पण त्यांना सुद्धां मनांत कांहीं विपरीत न आणतां महाराजांनीं जवळच केलं.

हैब०—असं असलं तर ठीक. येणार तर मग तिकडे. हे बघ संभाजी कावजी का कोणसं तूं आत्तां ह्मणालीस ते, आन् आणखी कुणी एक ब्राह्मण सरदार असे आमच्या रावमोऱ्यांकडे तुझ्या महाराजांकडन आजच

आल्याचं मला कळलं आहे. तेव्हां त्यांच्याशींच संधान जुळवून तिकडे येण्याचं करतों. बरं पण, मग तर तूं मला अशी झिडकारणार नाहींसना !

हिरा—अहो—

(४) धिःकारीलचि कोण ॥ तुह्माला ॥ धिःकारील० ॥ मनाप्रमाणें माझ्या····

—छे पण असं कशाला ?—

····ओळखून योग्यता आपुली खरी तिला जें योग्य ॥ वर्तन तें जरि करावयाला तुह्मी सिद्ध मग ॥ कोण तुह्माला धिःकारील० ॥

हैवती—खरं ना पण हें ? मग वयाणा ह्मणून एक गोड़सा दे बघूं. ( चुंबन घेतो ती मुरका मारते.) अहाहा!—

(५) गुण किति विचित्र या तव अधरीं ॥ गुण० ॥ ऐकुनि जुसते शब्द तयांतिल ॥ स्फुरण चढे मज नवेंच हें किति विचित्र० ॥ गुण कि० ॥ करितां आतां रसपानचि हें ॥ नये मना उत्साह कसा अति ॥ विचित्र० ॥

( जातात )

( प्रवेश २ रा—स्थळ, चंद्ररावाचा दिवाणखाना. )

**चंद्रराव**—( हुक्का घेऊन हुजऱ्यास )—राहूं दे तें. जा. कोणी मजकडे येणार आहेत, ते आले ह्मणजे त्यांना आंत पाठवून दे. आणि ते इकडे असत तोंपर्यंत अगदीं गैरराबता ठेव. समजलास ?

**हुजऱ्या**—जी. (जातो.)

**चंद्रराव**—( आपल्याशीं ) काय करावं. या शहाजीच्या पोरट्यानं हें काय कर्म आरंभलं आहे पहा. बापानं दादोजीपंताच्या ह्मणून देखरेखीखालीं याला इकडे ठेवला. तो चांगला पोक्तापुरवता शहाणा होता; तरी पण पडला ताबेदार. या पोरावर त्याची का मात्रा चालणार. अहो पांच वर्षांचं मूल धनी आणि शत वर्षांचा वृद्ध सेवक असला तरी त्या मुलाच्या हुकमांतच त्या वृद्धाला वागावं लागतं. तोच प्रकार इथें. हळुहळु त्या ब्राह्मणाचे हातचा सर्व कारभार या राजश्रींनीं आटोपून घेतला आणि मग आपण वाटेल त्या रीतीनं मुलुखाची व्यवस्था चालविली. आतां तर काय तो ह्माताराही विचारा मरून गेला. आतां याला नाहीं कुणाचा धाक. वाटेल तशी दांडगाई आरंभली आहे. आपल्यासारखेच चार पुंड जमा केले आहेत आणि

 जा/१८७०।

आज हा किल्ला घे, उद्यां तो प्रांत लूट, परवां याची उच-लवांगडी कर, तेरवां त्याजवर छापा घाल; काय सांगावं, खुद्द बादशाही खजिनासुद्धां यानें वेलाशक किंहो लुटून नेला! याची ही अशी पुंडाई सुरू झाल्यापासून पाहतों तों बादशाही सत्तेविरुद्ध हळुहळु साऱ्यांचींच मनं कशीं विथरत चाललीं आहेत. साधुसंत मंडळीचा तर व्यवसाय अगदीं वेगळा ना? पण त्यांनीं देखील अलीकडे आपला परमार्थविचार सोडून भलतेच उपदेश चालविले आहेत. यात्रांतून, उरुसांतून जिकडेतिकडे या गोष्टी. 'सोड आऊत, हो शिवाजीचा राऊत' हाच जणुं शेतकऱ्यांना नाद! फार काय सांगावं, घरांत आमच्या बायका सुद्धां आह्माला यवनांच्या ताबेदारीबद्दल खुशाल हवीं तशीं नांवं ठेवूं लागल्या आहेत. ऐका तें (कान देतो.)—

(पडद्यांत जात्यावरचें गाणें ऐकूं येतें.)

**असून मोठे शूर ॥ झालां गुलाम कां हो तुह्मी या यवनांचे ॥ झालां० ॥ येई तुह्मा न कैसा त्वेष ॥ पाहुनि विटंबना हे हाल गो-विप्रांचे ॥ पाहु० ॥ वाली कुणी न का आ-**

**झाला ॥ आतां धरून राहूं पाय देवाजीचे ॥ आतां धरू० ॥**

—पाहिलंत, जाल्यावर देखील तसलींच गाणीं चाललीं आहेत. अहो, असल्या गाण्यांनीं दळलं जाणारं पीठ हें या लोकांच्या पोटांत गेल्यावर तें त्यांना स्वस्थ कसं बसूं देईल? छेः, ही पुंडाई जास्त वाढूं देतां कामा नये. हा वणवा फार भडकला नाहीं तोंच तो पार विझवून टाकला पाहिजे. हें कालचं पोर असंच वळावलं तर उद्यां आमच्याही डोकीवर मिरीं वाटल्यावांचून राहणार नाहीं.

( रघुनाथपंत आणि संभाजीकावजी येतात. )

**चंद्रराव**—(त्यांचा मुजरा घेऊन) या बसा. तुह्मी रघुनाथराव, आणि हे संभाजीकावजी?

**रघु०**—होय. बरोबर आहे.

**चंद्र०**—कोणीकडे आलांत वरें आपण?

**रघु०**—आपल्याचकडे कांहीं राजकारणाकरितां शिवाजी महाराजांनीं आह्मास पाठवलं आहे.

**चंद्र०**—कोण? शिवाजी महाराज! हंः, वडील तर नुसते 'राजे'च आणि हे 'महाराजे' झाले का? काय हो कोणीं याला ही पदवी दिली?

**संभा०**—ती त्यांच्या गुणानेंच त्यांना मिळाली आहे.

**चंद्र०**—गुण? ह्मणजे हल्लीं उधळताहेत हेच ना?

**रघु०**—होय; असल्या पदव्यांना खरोखर शोभविणारें असें हल्लीं जें सत्कार्य त्यांनीं आपले शिरावर घेतलें आहे त्याचं हें फळ आहे.

**चंद्र०**—हें सत्कार्य काय? ज्याचं अन्न खावं त्याजवरच उठून चहूंकडे लुटारूपणा आणि दगेबाजी चालवावी, हें सत्कार्य खरेंच!

**संभा०**—अहो असें कां ह्मणतां?—

(अनुष्टुप) **हक्काचें आपुल्या सारें असतां अन्न आज तें ॥ होवोनी दास नीचांचें सेवावें नित्य लागतें ॥ लाचारींतूनि या सर्वां सोडवी यत्न जो तया ॥ देतां 'सत्कार्य' हें नांव मानावा दोष कासया ॥**

**चंद्र०**—( तिरस्कारानें ) आहे ठाऊक. लोकांचं, देशाचं, नाहीं तर धर्माचं गोडसं नांव पुढें करून त्याच्या आड स्वतंत्रपणानं आपण मोठेपणाला यायचं, हा मतलब आह्मी चांगला ओळखतों समजलांत?

**रघु०**—पण मी विचारतों कीं, तसा जरी मतलब त्यांचा असला तरी तोही आपणास इतका तिरस्कार कर-ण्यासारखा कां वाटावा वरं? अहो ज्यांनीं आपला देश पा-दाक्रान्त करून आपल्याला गुलाम बनविलं आणि आपल्या सर्वस्वाची वरतीं आणखी विटंबनाही चालविली आहे, त्यां-च्याच पुढें हांजीखोरपणा पत्करून जें मोठेपण मिळवायचं, त्यापेक्षां, आपण ह्मणतां तसं स्वतंत्रपणानं, इतकंच नव्हे तर, त्याच दुष्टांच्या छातीवर चांगला पाय देऊन तें मोठे-पण आमचे महाराज मिळवूं पहात असले, तर त्यांत वा-ईट काय आहे वरं?

**चंद्र०**—हें पहा रघुनाथपंत, पुनः त्या हरामखोराला 'महाराज' हे शब्द माझ्यासमक्ष लावूं नका.

**रघु०**—तर मग आपणासही आमची तशीच वि-नंति आहे, कीं त्यांच्या निंदेचा आपणही एक शब्द सुद्धां आह्मांदेखत बोलूं नका.

**संभा०**—बरोवर ह्मणतात हे—

**(६) शत्रुभाव शिवनृपाविशीं तुह्मा जसा॥ स्वामिनिष्ट सेवकगुण आमुतें तसा ॥ वर्णिलें**

**तयास तें तुह्मा न सोसवे ॥ आह्मास हि निंदा तरि कैंवि ऐकवे ॥**

**चंद्र०**—नाहीं ऐकवत तर कानांत बोटं घालून बसा; पण आह्मी त्याच्या कृत्याला कधीं वरं ह्मणणार नाहीं. व रघुनाथपंत, तुह्माला वजावून ठेवतों कीं, प्रसंगीं याबद्दल त्याला चांगलं शासन केल्यावांचूनही आह्मी राहणार नाहीं.

**रघु०**—तर मग, माफ करा, आह्मी पण आपल्याला असंच निक्षून सांगतों, कीं महाराजांच्या निंदकाला आह्मा-कडूनही योग्य प्रायश्चित्त मिळाल्याखेरीज राहायचं नाहीं.

**चंद्र०**( रागानें )—काय ? पुनः 'महाराज' शब्द त्या हरामखोरा—

**रघु०**—संभाजीराव, पहातां काय उडवाच.

( रघुनाथराव व संभाजीकावजी वार करतात. )

**संभा०**—( वार करतांना )—

(आर्या) **शिवनृपति-निंदकांचीं तोंडें ऐशीं-च बंद व्हावीं तीं ॥**............

**रघु०**—( वार करतांना )—

............**जे येति देशकार्या आड जसे सर्प त्यांस हीच गती ॥**

( चंद्रराव मरतो. )

**संभा०**—अहो, पण आपण आलों कोणत्या उद्देशानं आणि आवेशांत हें दुसरंच काय झालं. पुढं विचार?

**रघु०**—अझून ही गोष्ट या दिवाणखान्याबाहेर गेली नाहीं तोंच आपण इथून निसटून गांवाबाहेर आपल्या लष्करास मिळूं या. मग पहातां येईल. चलाच या बाजूनं ते पहा, चंद्ररावाचे भाऊ हणमंतराव येताहेत. (जातात.)

( दुसऱ्या बाजूनें हणमंतराव येतो. )

**हणमंत०** ( पाहून, संतापानें )—अरेरे, घात घात; केवढा घात हा! काय? इथें कोणीच नाहीं? ( हुजरे येतात ) अरे गाढवांनो,—

(गाणें) **होतां तुह्मी मेलां ॥ किंवा झोंपीं गेलां ॥ येउनि तुमचा बाप त्यानें अनर्थ काय केला ॥ बेहुषार झालां ॥ कैसे झिंगुन बसलां ॥ देउन तुमच्या पाय उरावर घातक निघून गेला ॥**

—बांधा भांचोदांना रश्शांनीं आणि जेरबंदाखालीं फोडा यांची पाठ!

( चंद्ररावाचा मुलगा सुरेराव येतो. )

**सुरेराव** ( बापाच्या प्रेताकडे पाहून )—हाय हाय ! काका. ( हणमंतरावाचे गळां पडून रडत ) काका, तेच वरं; तेच. ज्यांनीं हें नीच काम केलं आहे तेच आतां आपल्या लष्करासह या गांवावर आल्याचं समजतं.

**हणमं०**—तर मग गांवच्या तटावरील तोफांत प्रथम यांनाच ठांसून द्या धडाधड शत्रूचे आंगावर उडवून ! हरामखोर ! चल, सुरेराव, ही शोकाची वेळ नव्हे. आपले सर्व लोक गोळा करा. तटाबाहेर गांवच्या शिवेवरच त्यांना गांठून आधीं त्यांचा समाचार घेऊं, चल. (तरवार उपसून)

**(७) ही पहा करीं तलवार ॥ ही प० ॥ ह्राणमार करुं वार मारुं ठार व्हा तयार ॥ पहा० ॥ केलें ज्यांनीं ऐसें कृत्य अतिशय नीच ॥ आधीं त्यांना जमिनदोस्त करिन पहा मीच ॥ बळि दिल्यावीण त्यास ॥ अधीं रणदेवतास ॥ नाहींच या शरीरास ॥ हात लावणार खास ॥ पहा करीं त० ॥**

( जातात. )

(प्रवेश ३ रा—**स्थळ**—तटाबाहेरचें मैदान.—**पात्रें**—एकीकडून हणमंतराव, सुरेराव व त्यांचे लोक. दुसरीकडून रघुनाथराव, संभाजीकावजी व त्यांचे लोक येतात. )

**हणमं०**—अरे नीचांनो, असें गुप्त मारेकऱ्याचें कर्म करतां काय ? संभाळा, आतां गांठ या हणमंतरावाशीं आहे.

**रघुना०**—हणमंतराव, आपण मोठे रणशूर आहां हें आह्मी कबूल करतों; पण आह्मींही कांहीं हातांत बांगड्या भरल्या नाहींत हें आपण पक्कें समजून असावं.

**हणमंत०**—मग या पुढें. हातापेक्षां तोंडांतच शौर्य जास्त दिसतं.

**रघुना०**—त्याचा अनुभव दाखवतां येईल. पण हणमंतराव, आमच्या महाराजांची आह्माला सक्त ताकीद आहे कीं, विनाकारण रक्तपाताचे प्रसंग, आणि त्यांतून ते आपल्याच लोकांशीं आणून तुमच्यासारखीं उमदीं माणसं खराब करावीं हें बरं नाहीं.

**हणमं०**—तरीच वाटतं आपण आमचे बंधूस गैरसावध गांठून त्यांचा घात केलात! आपले यजमानाची आज्ञा आपण यथाशब्द पाळतां खरी !

**रघु०**—अहो, आपल्या बंधूंनीं आमच्या महाराजांची

केलेली निंदा आह्माला सहन झाली नाहीं ह्मणून तो प्रकार त्यांच्याशीं झाला. बाकी या जावळीची मराठी सरदारी फार दिवसांची जमलेली आहे, माणसंही चांगलीं आहेत, तेव्हां तुह्मी आह्मीच एकमेकांचं मर्म होऊन आपसांत कुटून न मरतां रावमोऱ्यांचे चिरंजीव हे सुरेराव आहेत यांनीं यापुढें आमचे महाराजांची चाकरी करावी आणि आपणही आह्माला साह्य व्हावं ही आमची आपणास हात जोडून विनंति आहे. रावमोऱ्यांकडे झालं तरी आमचं हेंच राजकारण होतं.

हण०—अहो जा.—

**(८) जा न घालिन भीक मी भुलुनी अशा मधुभाषणें ॥ हा न राहिल घेतल्याविण सूड निश्चित जाणणें ॥ लोळवूनचि या इथें सकलां तुह्मास न राहिन ॥ नीच घातकि तूमचा धनि तोहि मग मी पाहिन ॥**

**संभा०**—हां खबरदार. महाराजांची निंदा कराल तर जी रावमोऱ्यांची वाट तीच आपलीही लागेल.

**हण०**—कोण तूं कालचा पोर माझी वाट लावणार? चल ये पाहूं. ( तरवार सांवरतो. )

**संभा०**—ठीक आहे ( तरवार उपसून )—

(श्लोक) **हा घ्या मी वार केला**..............

**हणमं०**—( ढालेवर घेऊन )—

.......**चुकवुनि उलटा हा तुला मीच देतों॥**

**संभा०** ( ढालेवर संभाळून )—

**अंः, तो का मी झुमानी?** ....................

**हणमं०**—( पुनः वार करीत )—

...............**तर मग दुसरा**..............

**संभा०**—( चुकवून )—

....................**छेः पहा व्यर्थही तो ॥**

**हणमं०** ( त्वेषानें )—

**आतां संभाळ पोरा, करशिल गमजा तूं किती, ठार केला ॥**

**संभा०**–( वार चुकवून )—

**मी नाहीं; मात्र तुह्मी वडबड करुनी हें पहा ठार झालां ॥**

( हणमंतराव मरतो व सुरेराव धांवून येतो. )

**रघुना०** ( सुरेरावास पकडून )—**बस्स अधिक रक्त-**

पाताचं कारण नाहीं. आपल्याच लोकांच्या रक्तानं माखण्याकरितां ह्या तरवारी हातांत घेतलेल्या नाहींत. याहून यांना कामगिरी वेगळी आहे. सुरेराव, आपण आमचे कैदी आहां समजलां. यापुढें आमच्या महाराजांशीं इमानानं वागलांत तर चांगले इभ्रतीस याल. नाहींपेक्षां जी आपल्या वडिलांची व चुलत्याची वाट तिलाच अनुसरावं लागेल. असो. ऐका, जावळीकरांनो ऐका.—

( देखावा—जावळीचे लोक गांवचे तटावर येतात. )

—आजपासून तुह्मी शिवाजीमहाराजांची प्रजा झालां आहां. आमच्या महाराजांनीं स्वतः हिंदुधर्माकरितां फकिरी घेऊन यवनांचा पुरता निःपात करण्यासाठीं आपलं आयुष्य जरी सदां अनेक दंग्याधोप्यांत वेंचण्याचा निश्चय केला आहे, तरी आपली प्रजा ते किती सुखांत ठेवतात हें पुणें मावळ्याकडील त्यांच्या खास रयतेच्या आबादानीवरून तुह्मांला माहीत असेलच. आपल्या मुलुखाची यवनांनीं नासाडी केली आहे, आपल्या देवधर्माची त्यांनीं विटंबना चालवली आहे, आणि आपली स्वतंत्र व सुखाची स्थिति जाऊन नादान गुलामगिरी आपले कपाळीं आली आहे, यांतून आपणां सर्वांस सोडवावं ही आमच्या महा-

राजांची मुख्य इच्छा आहे, व त्याकरितां आपल्यांतल्या कर्तवगारीच्या प्रत्येक मनुष्यानं त्यांना साह्य अवश्य झालं पाहिजे. तेव्हां बोला हें सर्व तुह्माला कबूल आहे ना?

**सर्वलोक** (तटावरून)—कबूल कबूल. ह्यापुढं जिथं शिवाजीमहाराजांचा शब्द तिथं आमचें शिर असेल!

**रघुना०**—ठीक आहे, उघडा तर वेशीचे दरवाजे आणि हे आमचे विजयी संभाजीकावजी या बुरुजावर महाराजांचं निशाण लावतील त्यांना वाट द्या. (पडद्यांत शिंगें वाजतात.) वाहवा. महाराजांचीही स्वारी ऐन वेळेलाच येऊन थडकली!

**संभा०** (पाहून)—छे: एकटे मोरोपंतच दिसतात. ते पहा, त्यांचेच लोक.

(मोरोपंत आपल्या लोकांसह येतात.)

**रघुना०**—यावं यावं. कायहो एकटेच तुह्मी पुढं? महाराज कुठं आहेत? आमचा जासूद पोंचला ना?

**मोरोपं०**—जासूद पोंचला, आह्मीही आलोंच होतों जवळ, तें सर्व ठीक झालें. पण रघुनाथपंत, रावमोऱ्यांचा तशा प्रकारचा शेवट कांहीं महाराजांस आवडला नाहीं. ते नाखुष दिसले.

**संभा०**—आणि ह्मणूनच इकडे आले नाहींत कीं काय ?

**मोरो०**—त्याचं कारण वेगळंच आहे. इकडील हें पुढच्या बंदोवस्ताचं आज्ञापत्र त्यांनीं मला दिलं आणि तितक्यांत कांहीं एक त्यांच्या लाभकाळाचा तिथं चमत्कार घडला होता त्याच्यामागं ते दुसरीकडे गेले.

**रघु०**—चमत्कार ? तो काय वरं ?

**मोरो०**—आह्मी वाटेंत ज्या एका नदीचे कांठीं उतरलों होतों तिच्या पात्रांतून महाराजांस उद्देशून ज्यांवर कांहीं ओंव्या लिहिल्या आहेत अशीं झाडांचीं पानें वहात येतांना दृष्टीस पडलीं. तेव्हां तीं सर्व धरून त्यांजवरच्या ओंव्या महाराजांनीं कारकुनाकडून उतरून घेतल्या आणि ज्या दिशेनं तीं पानं वहात आलीं तिकडे कांहीं तरी आपला लाभकाळ आहे असं जाणून ते लागलींच निवडक लोकांनिशीं गेले. त्या भागांत 'समर्थ' नांवाचा कोणी एक ब्रह्मचारी आला आहे असं ऐकतों.

**संभा०**—महाराजांचं नशीव शिकंदर आहे बुवा. परवां त्या प्रबळगडावर पाहिलंत ना, बोरीच्या झाडाच्या फांदीनं त्यांच्या पालखीला अडवलं ह्मणून तिथं खणून पाहतात तों द्रव्याचा हांडा !

**रघु०**—इथंही त्या सत्पुरुषाच्या प्रसादाचा तसाच कांहीं लाभ व्हायचा असेल.

**संभा०**—खराच होईल—

(कामदा) **भाग्य यश पहा शिवनृपा जसें ॥ सहज चहुंकडे प्राप्त होतसे ॥ साधुसंत हे तेंवि त्यावरीं ॥ आपुलें कृपाछत्रही धरी ॥**

—तुकारामबोवांच्या भेटीचा प्रसंग आपल्याला माहीत आहेच.

**रघु०**—बरं पण या जावळीच्या बंदोबस्तासंबंधानं आपल्याला काय आज्ञा आहे?

**मोरोपं०**—जावळी हें रावमोऱ्यांचं ठिकाण, चांगलं यशस्वी आणि मातबर आहे. तेव्हां इथें आतां मजबूत किल्ला बांधून त्याचं नांव प्रतापगड ठेवायचं, आणि तुळजापूरच्या नमुन्यावर या किल्ल्यांत देवीची स्थापना करायची. महाराज नेहमीं ह्मणतात कीं जसा कुणबी शेताला माळा घालून तें राखतो तसं किल्ल्याच्या आश्रयानं प्रांताचं रक्षण करतां येतं. आणि तारवाला जसे खिळे तसे किल्ले हे प्रांताला मजबुती आणतात. किल्ल्यावर सामान पोक्त असलं आणि माणसं इतबारी असलीं ह्मणजे शत्रूची उमर गुजरून

जाईल पण एकेक किल्ला हस्तगत करून सर्व मुलख त्या-च्यानं जिंकवणार नाहीं.

**रघु०**—खरं आहे. बरं चला, ते पहा तटाचे दरवाजे उघडले. घ्या महाराजांचं नांव आणि चढवा निशाण.

**सर्वजण** ( कवायतीच्या थाटानें गांवांत शिरतांना )—

(१) **शिरा चला चढा तटावरीं मिळून जाउं या ॥ नेउनी निशाण हें तिथें समस्त लावुं या ॥ नव्हेच हें निशाण कीं मुहूर्तमेढ ही दिसे ॥ स्वराज्यरूप मंदिरा उपक्रमचि हा असे ॥**

—ह्मणा '**शिवाजीमहाराजकी जय**'!

( तटावर निशाण लागतें—पडदा पडतो. )

---

## अंक तिसरा.

[**प्रवेश** १ ला—**स्थळ**—जंगल. **पात्रें**—दोन गुराखी.]

**लिंब्या**—(एक बटवी घेऊन तिच्या नादांत आपल्या-शींच नाचत बागडत आहे.)

**अंब्या** (दुरून)—अरं ये लिंब्या, काय त्येकाचा तथ मला दिसतोया, पन वोवी घेत न्हाइ.

**लिंब्या**--( वटवी सोडून आपल्याशींच )-

**(१) अबबब, किती तरी हे होन ॥ अब० ॥ रुपये पुतळ्या मोहरा मोति वि ॥ मला भिकारी म्हनेल कोन ॥ किती० ॥ रानामंदीं वनवन फिरुनी ॥ गुरं अतां हीं वळील कोन ॥ किती तरी हे होन ॥ अहाहाहा किती त० ॥**

**अंब्या** ( प्रवेश करून )—अर ये भड्रट, कान फुटल्यात का काय? इचिभन तकड गुरं ग्येली कीं ऱ्येतांत !

**लिंब्या** ( न ऐकतां आपल्याशीं )—येक, द्वान, तीन, नगर वा; गिनल्यान ह्मन कमी व्हल्यात वस्स, आतां कोन ल्येक गुरं राखतुया !—

**(२) आतां हा गडी शिलेदार होनार ॥ आतां होनार ॥ हां आतां होनार ॥ शिलेदार ॥ शिलेदार बनुन मोहिमेवर जानार ॥ हां आतां जानार ॥ शिले० ॥ खासा मंदिल मांडचोळणा कुडतं कडं चौकडावि ॥ बरची ढाल तीरकमान ॥ घोडा बसायला घेनार ॥ आतां घ्येनार ॥ हां आतां घ्येनार ॥ शिलेदार ॥**

**अंब्या** ( पुढं होऊन )—अर, आज काइ भांगगांजा तर प्येला न्हाईस ? क्येढोळचा व्हकारतुया त ल्योकाचा आपल्याच तारत. तकड गुरं बघ गुरं—( त्याच्या हातां-तली वटवी पाहून )—ह्येरं काय ? अक्षी पिंवळं पिंवळं धमाक !

**लिंब्या**—हां, पाह्यलीस, भांग ही भांग !

**(२) बघ तर सइ ही भांग कशी ॥ तूं तर वघुनच तारवटशी ॥ हातिं आल्यावर मंग ॥ माझ्यावानींच ही बग ॥ कशी व्हइल तगमग ॥ लायिल रंगड्या करूं तुशीं ॥ तूं०॥**

**अंब्या**—अर पन विव्या ह्ये तुला कुठ गवासल का च्वारून आनलस ?

**लिंब्या**—ह्ये बग, गवासलं वी न्हाइ आंन च्वारून वी आनलं न्हाई.

**अंब्या**—मंग तुला कुनीं इनाम दिलं व्हय ? झोटी तरवारच मारली असशील जनु !

**लिंब्या**—अर त्यो त्या पल्याडल्या झाडींत कुवडी-वाला येक वावा येऊन राह्यला या न्हव का, हंग त्येनच दिलाया ह्ये संमद मला.

**अंब्या**—चल, काय विच्या सांगतुयास. त्या गोसाव्याजवळ ह्ये सोन मोतीं कुठलं रे ?

**लिंब्या**—अर त्यो शिवाजी भोंसला, आन त्ये रोज आपल पाटील न्हवत का त्येच्या याक्याक गोष्टी सांगत? हां त्योच. परवा त्या वावाच्या दरसनाला आला हुता, आन त्येन वघ त्या वावाची पुंजा ह्या झोरापुतळ्यांनं क्येली. पन वावान ह्ये संमद मलाच घ्येऊन जाया सांगतल. वावा झोटा चांगला हाए वरं का.

**अंब्या**—मंग लिंवाजीरांव तुमची तर झोटी चैन झाली. पन गड्या यांतल आपल्याला काइ दिलं पाहिजेत. आपुनतुपुन दोस्त न्हाइ वरं ?

**लिंब्या**—ह्यें वघ दिईन. पन त्या वावानं येक कामगिरी सांगतलीया ती तू मला करूं लागशील तरं.

**अंब्या**—अलबत. का न्हाई करनार ?

**लिंब्या**—मंग चल तर ही गुरं घेऊं गांवांत लावून. आन असंच टाकोटाक जावळीकड जाऊन तकडची त्या वावाला वातमी आणून देऊं. यिजापुरासन कुनी येक सरदार झोट लसकर घ्येऊन आलाया तथ, आन त्येच्या समाचाराकरतां त्यो शिवाजी भोंसला खूप लगवगीनं तकड गेलाया.

**अंब्या**—आं, मंग तर तथ झोटी चकमक उडल !

**लिंब्या**—आन त्येला का भ्येतोस तूं? थुः तुझ्या मी ! आपुनमर्द हाऊत का कोन हाऊत? अर त्यो शिवाजी अक्षी वग तुझ्या माझ्या उमरीचा हाए, पन त्या सरदारानं वाटन ह्मन काय तुळजापुरच्या देयीला भराडली आन ह्यें ऐकलं तवा कसा वाघावानी चवताळून ग्येला कीं धांवत !

**अंब्या**—अर, मी भ्येतुया कुठं; पन गड्या ह्या येळचा सकून न्हाइ चांगला दिसत. त्ये वग, द्वान वोडकं वामन पुढं येत्याती.

**लिंब्या**—अर दळ्या त्ये सनान करून येत्याती, त्येंचा सकून वाईट न्हव. अंब्या यामंदीं त्यो पल्याडला वामन, लई भसम फासलेला हाए न्हव का, हां त्यो वग असा तापट हाए कीं काई पुसूं नग. मी त्या वावाच्या मठांत रोज वगतो अक्षी गागत असतो, आन् ह्मनूनच त्येला गागाभट ह्मनत्यात कीं काय कोन जान! ह्यें वग—

**(४) चल अपुन वाजुनं जाऊं र ॥ नातरी उगाच श्या खाऊं ॥ सूर्व्यावानी कडाक लई त्यो सवळा त्यांतुनं वामन ॥ 'यिटाळ, यि-**

टाळ' करतां व्येजार उड्या मारतो टन टन॥
चल अपुन० ॥

(पळत निघून जातात.)

---

[ **प्रवेश २ रा---स्थळ,** तेंच.—**पात्रें,** गागाभटजी व वामनपंडित, स्नान करून मठाकडे चालले आहेत.]

**गागाभट्ट**—काय हा अनाचार, केवढा अधर्म, अब्र-ह्मण्य, अब्रह्मण्य! वामनपंडित, तुह्मी देखील ह्या गोष्टी खुशाल स्वस्थ मनानं पहातां ना? इतकंच नव्हे, तर त्या उक्तच होत असंही प्रतिपादन करतां? अहो स्त्रियांनीं पुराण सांगावं, शूद्रांनीं कथा कराव्या आणि तुह्मासारख्या महाशास्त्र्यांनीं त्याला खुशाल माना डोलवाव्या, हें आपल्या दृष्टीला तर अत्यंत अनुचित दिसतं. हे संतावे या दक्षिणेंत फारच माजले आहेत. चारी वर्ण आपापल्या मर्यादा सोडून असे वागूं लागले तर कालांतरानं पुढं होणारा वर्णसंकर आजच ओढवला असं ह्मटलं पाहिजे!

**वामनपंडित**—गागाभट्ट, आपल्याला ब्राह्मण्याचा एवढा अभिमान आहे, आणि वर्णाश्रमधर्माची इतकी का-ळजी आहे हें आपण श्रीक्षेत्र काशींतले आजकालचे एक

वसिष्ठवामदेव आहांत ह्मणून योग्यच आहे. त्या दृष्टीनें मीही तुमचा हा इकडील प्रकाराविषयीं तिरस्कार सुयुक्तच मानतों. परंतु आतां आपण काशी सोडून इकडे दक्षिणेंत आलां आहां आणि पुढं रामेश्वरापर्यंतही जाणार आहां. तेव्हां सध्यां झालेली एकंदर देशस्थिति आपले अवलोकनांत आली ह्मणजे आपल्याला खचित असंच वाटेल—

**(५) कर्ममार्ग ते दुर्गम झाले ॥ अपूर्णतेनें निष्फल ठरले ॥ आश्रमसीमा लुप्तचि होती ॥ अविधकृत विघ्नें बहु पीडिती ॥ उपाधिविपुल अशी सद्यःस्थिति ॥ अधर्म वा धर्मांतर उरलें ॥ कर्म० ॥**

—आणि हा प्रकार आपल्या प्रत्ययास आला ह्मणजे इकडे हें संतमंडळ उत्पन्न होऊन त्यांनीं आचांडाल सर्वांस सुलभ असा जो ईश्वरप्राप्तीचा भक्तिमार्ग लावून देण्याचा उद्योग चालविला आहे, याचं महत्त्व आणि अगत्य आपल्या ध्यानांत आल्यावांचून राहणार नाहीं.

**गागा०**—अहो मी भक्तिमार्ग निषिद्ध ह्मणतों अशांतला अर्थ नाहीं. पण स्त्रिया शूद्र हे आपापल्या अधिकाराचा अतिक्रम करताहेत त्यावद्दल माझं ह्मणणं आहे.

**वामन०**—अहो, परमार्थविषयांत स्त्री शूद्र हा भेद नाहीं हें प्रत्यक्ष श्रीभगवंतानच स्पष्ट सांगितलं आहे—

(६) **छे छे नच भेद हा परमार्थदृष्टिला ॥ भगवद्गीतेंत विशद भाव दाविला ॥ छे छे०॥ स्त्री वैश्यहि शूद्र तसा कोणिही असो ॥ दुर्लभ परमार्थ त्यास किमपिही नसो ॥ भक्ति एक पात्र करी सम अधिकाराला ॥ छे० ॥**

—शिवाय, तुकारामबोवांसारख्यांस वैश्य किंवा शूद्र लेखून त्यांच्या प्रासादिक वाणीचा धिःकार करतांना विचारच करावा लागेल. अहो—

(श्लोक) "**जयाची वदे पूर्ण वेदार्थवाणी ॥ ह्मणावें कसें हो तयालागिं वाणी ॥ परब्रह्मरूपीं असा जो तुकावा ॥ तयाचे तुकीं कोण दूजा तुकावा ॥**"

**गागाभ०**—राहूं द्या तो परमार्थविषय. त्यांतला एक अधिकार अनधिकार असो; पण त्या शिवाजी भोंसल्यासंबंधानें तरी काय आहे हो? तुमच्या रामदासस्वामींनीं त्याला तर क्षात्रकुलीनास मात्र अधिकार ज्याचा असा

छत्रसिंहासनाधीश्वरच बनविण्याचा घाट घातला आहे.

**वामन०**—अहो, समर्थांच्या योजनेप्रमाणें तो छत्रसिंहासनाधीश्वर झाला, तर रघुवीरास ज्याप्रमाणें वसिष्ठऋषि त्याप्रमाणें त्याच्या राजोपाध्यायाचे ठिकाणीं तुमच्यासारख्याचीच योजना होईल !

**गागा०**—काय, शूद्राची सेवा ? विष्णवे नमः !

**वामन०**—भटजी, आजकाल ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य यांची दुर्दशा काय झाली आहे, हें आपण लक्षांत आंणलं नाहीं. अहो—

(७) **कर्मलोप ह्मणुनि विप्र पतित जाहले ॥ परदास्यें ग्लानीतें क्षात्र पावले ॥ शांतिचा अभाव ह्मणुनि वैश्य संपले ॥ उरली क्षुद्र अशी शूद्रदशा मात्र आपणातें ॥ किति दुर्गतिला पात्र भरतभूमि आज दिसते ॥कि०॥**

—अशा या दशेंतून जर कांहीं आपल्याला उन्नतावस्था येण्याची आशा असली तर ती एक याच पुरुषाच्या पराक्रमावर अवलंबून आहे हें आपण निश्चित समजावें. अहो मी तर असेंच ह्मणतों, कीं--

**(८) यवनतमविनाशनास । स्वजनवीर्यदीपनास ॥ शिवरूपें उदित खास ॥ क्षात्रतेज हें ॥**

—या पुरुषाला येऊन साह्य होण्याची श्रीरामचंद्राची आज्ञा उगीच का ती समर्थांना झाली आहे ? आतां आपण त्या पुरुषाचं एकेक चरित्र ऐकाल ह्मणजे आपलीही खात्री होईल.

(कल्याणस्वामी घाईनें येतात.)

**वामन॰**—कां कल्याणस्वामी, इतकी लगवग कां ?

**कल्याण॰**—आपल्यांलाच बोलवायला आलों. लौकर चलावं.

**गागा॰**—इतकी घाईशी ? समर्थांचं आन्हिक आटोपलं वाटतं ?

**कल्याण॰**—ते मघांच बाहेर येऊन बसले आहेत. शिवाजी राजे तिकडे विजयी झाल्याची बातमी आतां जासुदानं आणली, आणि मागून तेही इतक्यांत येणार आहेत असंही कळवलं आहे.

**गागा॰**—तेव्हां समर्थांनीं उघडच पूजाविधीचा संक्षेप केला !

**वामन॰**—एकून विजापुराहून आलेल्या त्या जबर-दस्त खानाचा शिवाजीनं समाचार घेतला तर ? शाबास !

**कल्याण॰**—अहो समाचार असा तसा नव्हे, तर त्या मस्त राक्षसाशीं त्या पुरुषानं स्वतः दोन हात करून त्याला पुरता चीत केला, आणि त्याचं शिर कापून ज्या तुळजापूरच्या देवीचा त्या दुष्टानं उच्छेद केला होता ति-चीच प्रतिमा जी प्रतापगडीं स्थापिलेली देवी तिला तो बळी अर्पण केला !

**वामन॰**—व:, बळी द्यायला दिवसही हे आयतेच नवरात्राचे सांपडले !

**कल्याण॰**—अहो या नवरात्रामुळेंच अनायासानं प्र-तापगडीं यावेळीं गोंधळीही बरेच जमले होते, त्यांनीं शि-वाजीराजाच्या या विलक्षण कर्तृत्वावर लागलींच कवनेंही करून चहूंकडे लोकांना आतां ते ऐकवीत निघाले आहेत. मठांतही समर्थांपुढें एक गोंधळी तसलाच पवाडा ह्मणतो आहे व तो ऐकण्याकरतांच तर तुह्मांला लौकर घेऊन यायला त्यांनीं मला पाठवलं आहे.

**वामन॰**—फार उत्तम. आमच्या या वेदमूर्तींना तो ऐकविलाच पाहिजे. चला. ( जातात. )

[ **प्रवेश २ रा—स्थळ**—समर्थांच्या मठाचा बाहेरील भाग. **पात्रें**—समर्थांपुढें एक गोंधळी पवाडा ह्मणतो आहे असा **देखावा.** वामनपंडित, गागाभट्ट व कल्याणस्वामी येतात.]

**रामदा०**—( गोंधळ्यास ) अरे बुवा थांव. फिरून पहिल्यापासून ह्मण तो. हे आले. या पंडित. भट्टजी, तुह्मी या असे. पंडित, माझा शिवबा विजयी झाला!

**वामन०**—आपला सिद्धांतच आहे तसा. तो अन्यथा कसा होईल?—

(दिंडी) **समर्थांच्या सेवका वक्र पाहे ॥ सर्व भूमंडळिं कोण असा आहे ॥ लिळा ज्याची वर्णिती लोक तीन्ही ॥ उपेक्षीना तो स्वभक्ताभिमानी ॥**

**रामदा०**-हं चालूं दे बाबा, ऐका.

**गोंधळी**—

**(१) आधिं हो गणराया वंदुन ॥ सारजा चरनातें नमुन ॥ मग तुळजाई सुमरुन ॥ कीर्त गाईन ॥ शिवरायें वधिला कसा मस्त तो खान॥ देश दुनिया काबिज केली ॥ फिरयाद बा-**

च्छायाप गेली ॥ विजापुरीं आग चेतली पैज
ती पडली ॥ "जित पकडुं शिवा" अफ्ज़ुलें
प्रतिज्ञा केली ॥ मग तो खान कटकबंदिन ॥
निघे तइं झाला अपशकुन ॥ लसकऱ्या हा-
त्तिला मरण न तें परि गणुन ॥ दर कूच
मजल ये करित चढाई करुन ॥ मोठ हो
खानाचं लस्कर॥ एकटा घोडा चौदा हजार॥
ये करित वाटनं कहरच बेसूमार ॥ भरडली
देवि तुळजाइ मुलुख बेजार ॥ ही मात रा-
याला कळं ॥ होय मग चित्ताची खळबळ ॥
ऊभाच चिरिन अफ्ज़ुल ॥ असं मनिं धरलं
पुण्याइ सबळ रायाचि खरं तें केलं ॥ सो-
डुनी युद्धाच्या वार्तेला ॥ डौल तह कर-
ण्याचा घातला ॥ रायास पुरा यांतला किं
मतलब कळला ॥ खानाचं कपटच पुरं भों-
वलं त्याला ॥ एकांतिं भेटतां खान ॥ वधे
धरुं राया कव मारुन ॥ शिवराय सावधचि

ह्मणुन निघे निसटून ॥ खानाचि कट्यार खर-खरे चिलखतावरुन ॥ शिवरायें डाव्या करीं ॥ वाघनखें चालविली मारगिरी ॥ कोथळा काढि बाहेरिं ॥ खान परि मारी ॥ रायास हात पट्ट्याचा लागला शीरीं ॥ मग रायही चवताळला ॥ हात पट्ट्याचा पडताळला ॥ जानव्याचा दोरा केला आफ्जुलख्याला ॥ खानाचें कापुन शीर गडावर गेला ॥ बत्तिस दांतांचा बोकड ॥ वाहिला रायें देवीपुढं ॥ पसरली मात चहुकडं यवन तडफड ॥ गाइलं कवन त्या दिलं सोन्याचं कड ॥

(गोंधळी मुजरा करून जातो.)

कल्याण०—महाराज, शिवाजी राजे आले.

रामदा० (आनंदानें उभे राहून)—अहाहा !--

(१०) पसरुनि आधीं प्रकाश भुवनीं सूर्योदय व्हावा ॥ परिमल अनुभवुनी मग दृष्टिस पुष्पाकर यावा ॥ शिवशौर्याचा प्र-

**भाव तैसा आधीं श्रुत व्हावा ॥ नंतर सुखक भेटीचा हा योग असा यावा ॥**

—रघुवीर समर्थ ! रघुवीर समर्थ ! !

( शिवाजी, तानाजी व संभाजीकावजी येतात. )

**शिवाजी** ( समर्थांपुढें तरवार ठेवून )—

**( ११ ) विजयि शस्त्र ठेउनि पदिं विनः दास हा मी ॥....**

**रामदास**–( त्याला उठवून )—

**....ऊठ ऊठ बा शिवबा, कीर्ति केली नामी**

**शिवाजी—**

**....यशदायक सत्य असे भवत्कृपा स्वामी**

**रामदास—**

**....प्राप्त सहज तें जरि बा शुद्धभाव रामीं ;**

—शिवबा, अरे इतक्यांतच शस्त्र ठेवून कसं चालेल बा अद्याप त्याचं कार्य पुष्कळ आहे.

**शिवाजी**—महाराज, या चरणापाशीं आलं, ह्मणः मनाची प्रवृत्ति कांहीं वेगळ्याच प्रकारची होते.—

(१२) मन घे प्रपंचीं उदासीनता ॥ सो-
नी ऐहिक मोहममता ॥ करूं वाटे नरदेह-
ार्थकता ॥ स्वामीसमर्थाविण मज आतां
न्य न दाखविता सुपथा ॥ मन० ॥

रामदा०—अरे वा, तुझ्या सहजसात्त्विकवृत्तीचा भाव आहे तो. पण शिववा, तुझ्या हातून कांहीं वेळेंच देशकार्य व्हावं अशी श्रीची योजना आहे, समलास—

(१३) धर्मस्थापन गोद्विजपालन निर्मू-
न दुष्टांचें ॥ दास्यशृंखलेंतून विमोचन
रणें वा स्वजनांचें ॥ तव शिरीं भार हा
ाहे ॥ योजना असे श्रीची हे ॥

—आणि या योजनेप्रमाणें तूं वागल्यानंही देहसार्थकतेचं य तुला मिळणार आहेच. कारण—

(१४) ज्ञान-कर्म-हट-राजयोग ते ॥ यांहिं
सें तनुसार्थक होतें ॥ तसा पराक्रमयोग
ाहि दे ॥ इहपर सार्थक तें ॥

शिवा०—श्रीची आज्ञा मला शिरसा वंद्य आहे—

(साकी) **भवत्कृपेनें तसेंहि आशीर्वचनानें जननीच्या ॥ जिवास देती जीव अशा कीं साह्यानें स्वजनांच्या ॥ भार शिरीं धरिन ॥ कार्यें नियुक्त तीं करिन ॥**

**रामदा०**(शिवाजीच्या लोकांस)–ऐकलंत रे गड्यांनों,–

(मोठी साकी) **होउनि एक मराठा तितुका हलकल्लोळ करावा ॥ असे महाराष्ट्रधर्म अपुला प्रसृत जनीं तो व्हावा ॥ देशोद्धरणार्थ ॥ मरणें हाची परमार्थ ॥ मरणें हकचि त्यांत नित्य तें अशांतिच्या या समयीं ॥ दुष्ट दंडितां धर्म रक्षितां ये तरि सुगतिच देई ॥ अभिमुख व्हा त्यातें ॥ न चुका निज-कर्तव्यातें ॥**

**शिवा०**—दासाची एक प्रार्थना आहे कीं, या चरणाची सेवा आणि नित्यदर्शन हीं अंतरूं नयेत.

**रामदा०**—अरे वा, आह्मी अरण्यवासी, तुह्मी देश-कार्याचा भार शिरावर घेतलेली मंडळी. नित्य सहवास अशक्य होय. तथापि स्मरण होईल तेव्हां जवळच आहों.

असो, कल्याणबोवा, तुह्मीं राजश्रींबरोबर मठांत जाऊन त्यांस श्रीरघुपतीचं दर्शन करवावं. आणि श्रीस आमची विनंती सांगावी कीं, आज शिवबास खुद्द आपला प्रसाद मिळाला पाहिजे.

**कल्याण०**—आज्ञा प्रमाण—

( शिवाजी, त्याचे लोक आणि कल्याणस्वामी जातात. )

**वामन०**—कां गागाभट्टजी, आतां या पुरुषाविषयीं आपली कल्पना काय आहे ?

**गागा०**—आहाहा ! विनय किती, धैर्यशौर्य केवढं, साधुसंतांच्या ठिकाणीं निष्ठाही तशीच. यांवरून ईश्वरांशभूत असलेल्या पुरुषाचीं च लक्षणं इथें दिसताहेत.

**रामदा०**—सत्य आहे—

( दिंडी ) **दिसति अतितर सद्गुण प्रकट जेथें ॥ ईश्वरांशचि समजणें खचित तेथें ॥ विभुति ऐशी कधिंकधीं प्रकट होते ॥ जगत्कल्याणश्रेय खचित घेते ॥**

**वामन०**—मग आतां तर समर्थांचा हेतु सिद्धीस न्यायला आपलं त्यांस साह्य मिळेल ना ?

**गागा०**—निःसंशय मिळेल. ही यात्रा संपवून काशीस परत गेल्यावर पहिलें कार्य तें.

( पडद्यांत 'आश्चर्य, आश्चर्य' असा शब्द. )

**वामन०**—मठांत श्रीचे सन्निध कांहीं तरी चमत्कार घडला असावा असें वाटतें.

**राम०**—चलाच तिकडे सर्वजण. पाहूं काय तो.

## ( मठांतील राममंदिराचा देखावा. )

**कल्याण०** ( पुढें होऊन )—राजश्रींना प्रसाद द्यावा ह्मणून आपली विनंति श्रीस निवेदन करतां श्रीचे मस्तकावरील मोगऱ्याच्या कळ्यांचा तुरा एकदम घरंगळून खालीं आला; तो झेलून मी राजश्रींना प्रसाद ह्मणून देऊं लागतों तों तो एकदम मोत्यांचा झाला! हा पहा.

**राम०** ( तुरा घेऊन शिवाजीचे मस्तकीं खोंवतो. )—अहाहा! शिववा तूं धन्य आहेस!

**शिवाजी** ( नम्र होऊन सद्गदित अंतःकरणानें. )—

**(१५) भवदाश्रय हा घडवि अनुग्रह श्रीचा या दासावरतीं ॥ नातरि कुठुनी श्रेष्ठ प्रसादप्राप्ति अशी मजला होती ॥**

**इच्छा आतां एकचि उरली कथितों स्वामी परिसावी ॥ भूषणयोग्य अशी मजकरवीं कांहीं महत्कृति घडवावी ॥**

**राम०**—अरे वा, तुझा आतां सर्व भार श्रीनेंच पत्करला आहे, तेव्हां हें शिरोभूषण जसें तुला तसाच तूंही आपल्या कृतीनं या देशाला शोभवशील यांत संशय नाहीं. बरं, कांहीं थोडं माझं आन्हिक राहिलं आहे, तें मी आटोपतों तोंपर्यंत मठांत नैवेद्याची तयारी होईल. आज इथंच प्रसाद घेऊन जायचा. समजलास.

(रामदास, कल्याण, गागाभट्ट, वामनपंडित जातात.)

---

**शिवाजी** (आपल्या लोकांस)—तानाजी, अहो संभाजीकावजी, समर्थांचा उपदेश ऐकलात ना?

("होउनि एक मराठा०" हें पूर्वोक्त पद्य ह्मणतो.)

**ताना०**—(तरवार उपसून) त्येचा प्रत्यव ही वया दावनार; वखुत आला की ही निघालीच वगा वाहीर! वेलाग हात चालवूनशान गनीमांच्या लस्करांत, वावा सांगत्यात तसा, हलकल्लोळ करून द्यायला ह्या तानाजीचा पाय समद्यांच्या पुढं. 'या अल्ला, नगरेवा या मराठ्यांशीं गांठ'

असं जर त्या दगडखां धोंडखांसनी कराया न्हाइ लावलं तर ह्यो नांवाचा तानाजी मालुसराच न्हव ! परवां त्या परतावगडच्या रानामंदीं जशी खूप लांडगतोड कराया गवासली तसा परसंग मातर आला पाह्यजे.

**शिवा०**—अहो प्रसंग येताहेतच एकेक तसे. प्रतापगडाहून निघालों तेव्हांच कळलं आहे, कीं दिल्लीहून पाहिस्तेखां नांवाचा कोणीएक सरदार आह्मावर रवाना झाला असून तो मोठमोठ्या मजला करीत इकडे येत आहे. घमेंड तर मोठी दिसते आहे त्याला. पुढं आपल्या जासुदावरावर पत्र पाठवून काय लिहितो पाहिलंत का हें आह्माला—

(साकी) **मर्कट तुह्मी वनचर सारे पर्वताश्रयें असतां ॥ वज्रपाणि मी साक्षात् आलों गिरिदुर्गांचा शास्ता ॥ संभाळा आतां ॥ पाहिन तुह्मि कुठें लपतां ॥**

**ताना०**—आं ? ह्ये मुसंडा आमासनी माकडं ह्मनतो व्हय, माकडं ? ये ह्मनावं, आमी माकड तर तुलावी वोकड करूनशान दावनीला गुतवतो वग !

**संभाजीकावजी**—आन् लेकानं आपल्याला इं-

द्राची उपमा घेतली आहे इंद्राची. पण फसला बेटा! वानरांचा मुख्य जो मारुती तो इंद्रदेवाहूनही थोर अशा शंभुमहादेवाचा अवतार होय हें त्याच्या लक्षांत आलं नाहीं. ह्मणावं, तूं नोडग्या वज्रपाणि आहेस तर आमचे महाराज वज्रदेही आहेत!

**शिवाजी**—अरे, त्यानं वानर ह्मणून आंपली चेष्टा केली आहे ना? तर मग आपणही मारुतीनं जसं लंकेंत रावणाच्या अंतर्गृहांत शिरून सहज लीलेनं त्याची खूप धांदल उडवून दिली, त्याचप्रमाणं ही स्वारी जिथें कुठें आतां तळ देऊन पडेल तिथें मोठ्या शिताफीनं जाऊन असं त्याला त्राहिभगवान् करून सोडूं, कीं स्वारी धास्तीच खाऊन आली तशी मुकाट्यानें परत जाईल.

**तानाजी**—ह्यें पा, ही कामगिरी आपुन बजावनार. आपुन जानार आन् त्येचं पुरतंच काम करून येनार वगा.

( चर्पटपंजरी ) **लस्करामंदीं त्येंच्या शिरतों॥ गोळा जनुं तोफेचा घुसतो॥ संमद त्ये गर्दीला मिळवतों। फत्ते खाशी करून येतों॥**

**शिवाजी**—अरे, या प्रसंगीं कांहीं तरी वेगळा हुनर लढवून या सरदाराला नुसतं जें घावरवूनच सोडण्याचं

माझ्या मनांत आलं आहे त्याचं कारण आहे. हें पहा.

**(१६) असुनि यवन इंद्र नांव आपणास घेइ तो। प्रीति अशी हिंदुदेवताविशींहि दाविती ॥ ह्मणुनि त्यावरी करूं दयाच कीं मनांत ये ॥ लावुं पिटुनि पार परी ठार त्या करूं नये ॥**

**संभाजीकावजी**—पण महाराज, आपणच जातीनं आपला जीव असा वारंवार धोक्यांत घालूं लागलां तर आमच्यासारखे सेवक आपल्याजवळ असल्याचा उपयोग काय? आपला पुस्तपन्हा असावा. चाकरी आह्मापासून घ्यावी.

**शिवा०**—अहो, मोठमोठ्या तीन पातशाहतींशीं आमचा दावा. तेव्हां दहा दहा वीस वीस कोस ज्यांचा तळ अशीं अवाढव्य लष्करं वारंवार प्रत्येक रियासतीकडून आमच्यावर चालून येणार, त्यांच्याशीं दरखेपेला असा समोर सामना देऊन आपल्या मुलुखाची व माणसांची खराबी केल्यानं निभाव कसा लागावा बरं? असो, चला. हें पहा, तानाजी, तुला एकच सांगतों—

(१७) शक्ति असावी सदां सिद्ध जरि निर्विवाद ही गोष्ट असे ॥ कार्य परंतू साधुं पहावें युक्तिनेंच वा होय तसें ॥ शक्तिस आहे भय व्ययाचें युक्तिस तें तरि किमपि नसे ॥ बलवत्सृष्टिस मनुज आक्रमी केवळ युक्तीनेंच कसें ॥

(पडदा पडतो.)

---

## अंक चवथा.

[प्रवेश १ ला.–**स्थळ**— विजापूर.—**देखावा**, दरबार. **पात्रें**—बादशाहा, वजीर, दिवाणमुरारपंत, पीरसाहेब, रणदुल्लाखान आणखी कांहीं सरदार, चोपदार वगैरे.]

**भाल० चोप०**—खामोष ! खामोष !

**वजीर**—हुजूर, आप जो ऐसे गमगीन होके बैठ रहे तो इस रियासतकी आगे कारगुजारी कैसी चलेगी? आज इस दरबारमें बडे सरदार, अमीर उमराव–जो के इसपायतख्तके नमकख्वार है–वो सब हाजीर है. हाल जिस आफत्में आप मशगूल हो उसीसे बाहर निकलनेका कुचभी रास्ता येही लोग दिखायेंगे.

**वादशाहा** ( खिन्न मुद्रेनें आपल्याशीं )—

**(१) या इलाही! कैसे मै ये आफत्में गिरफ्तार हूं ॥ तेरि कुदरत क्या यही है मै तो गुन्हागार हूं ॥ सलतनत जो नेकनामीसे चली बहोत दीनसे ॥ वख्त आया डूबनेका अखर मेरे हातसे ॥**

**पीरसा०**--खुदानखास्तबाशद! हुजूर, आपके दिलमें ये क्या फिक्र पैदा हुई? सिवाजी अदनासा आदमी, उसके लिये आप इतने रंजिदा हुवे हो. आपकी इतनी वडी रियासतके आगे वो मरगट्टा क्या माल है. जैसे पहाडमें तिनका!

**रणदुल्लाखान**--अजी पीरसाहेव, आप जो इस सलतनतकी तारीफ करते हो वो तो ठीक है. मगर उस वदमाष सिवाजीकी सच्ची क्या हालत है ये कुच वरावर नही मालुम होती. वो हरएक काममें जो फत्ते पाता है, तो उसकी तयारी जारी होगी या उसकु कोई तोभी पुरा उस्ताद मदतगार होगा. नही तो इतना जोष उसीमें कहांसे आता! देखो, इतना भारी सरदार अफजुलखां तो

उसीने पार नेस्तनाबूद कर दिया; वैसाही उनके पीछे और जो अपने सरदार गयेथे उनकाभी उसीने कुच काबू न चलने दिया. ये तो क्या, लेकीन अब तो ऐसाही सुननेमें आता है के, दिल्लीसे जो बडा सुभा षाहिस्तेखां उसके उपर चढाई करके आयाथा, उनकु ये सैतानने ऐसे तरकीबसे घबरा दिया, के ओ मारे जानेके डरसे कैसेभी अपनी जान बचाकर भाग गए! तो अब कहीये, ऐसे करामत-वालोंको आप क्या कमतरीन समजोगे?

**वजीर**—सिर्फ सिवाजीके लिये हम बेफिक्र रहे, तोभी हमजाद होके दिल्लीवाले अलमगीर बादशहा ये विजापूरकी रियासत जो डुबानेकी कस्त करते है उस्का तो गौर करना मुनासब है? आजतक उन्होने हमारे रूबरू दख्खनके कईएक सलतनत बरबाद कर दी. अब तो युं आफवा फेली है, के सिवाजी भोंसला मोंगलका मनसबदार होके उनके मदतसे ये सब दख्खन अपने काबूमें रखनेका इरादा करताहै, और ये कारवाईकू दिल्ली-वालेभी राजी हुवे है!

**बादशहा**—( सर्वांस उद्देशून )—

**( २ ) अब तो ख्याल करो ये कैसे ॥ खडी**

**मुसिबते चारों तरफसे ॥ मैतो कमउम्र हूं बेइल्मी ॥ तुम हो वाकबदार कदीमी ॥ कुच तो तदबीर ऐसी निकलना ॥ दुष्मन् कर ना सके कुच अपना ॥**

**मुरारपंत**--आज खाविंद ज्या फिकिरींत आहेत आणि या अद्दीलशाहीवर हा जो भयंकर प्रसंग येऊन गुजरला आहे, त्यासंबंधानें हुजूरची खप्पा मर्जा न होईल तर मला एक विचार सुचतो आहे, तो मी सांगतों. दौलतीच्या हिताची गोष्ट असेल ती, आह्मी दौलतीचे कदीमी नौकर आहों, त्यापक्षीं आह्माला सांगितलीच पाहिजे; आणि हुजूरची हल्लीं इच्छाही तशीच आहे. तथापि आजचा माझा विचार कांहीं वेगळ्याच प्रकारचा असल्यामुळें त्याला हुजूरचें अगोदर अभय मिळालें पाहिजे.

**पीरसा०**--देखो दिवाणसाब, कुचभी कहना होय तोभी दरबारकी बेअदबी न होवे ऐसे अपनी लियाकदकी माफेक कहनेकी तो खबरदारी रखना जरूर है ?

**बादश०**--अजी सय्यदसाहेब, उनकी बातको रोकना मुनासब नही. मुरारपंत, आपके ख्यालमें जो मजमून कहेनेका होय वो बेशक फर्माइये.

**मुरा०**—मला या वेळीं हिंदूंच्या तरफदारीचं बोलायचं आहे. आणि स्वतः मी हिंदु असल्यामुळं त्यासंबंधानें मजविषयीं भलतीच कल्पना होण्याचा संभव आहे. याकरितां मला अगोदर हुजूरची अशी विनंति करावी लागते; याची माफी असावी.

**बादशहा**—अजी मुरारपंत, देखो—

**( ३ ) मुसलमिन हो चाहे हिंदू मुझे दोनो बराबर है ॥ मुजाएका नहीं कुच जो मेहकूमे वो हमारे है ॥**

**पीरसाहे०**—लाहोलवल्ला ! क्या, इस्लामी और काफर दोनो बराबर ? लिखते है के ये सब काफ—

**वजीर** ( त्यास थांबवून )—अजी साहेब, इसवख्त ये बाते मत निकालो.

**मुरा०**—या तख्ताचा जरी मी बंदा गुलाम आहें, तरी जातीनें हिंदु असल्यामुळें जवळ दूरच्या सर्व हिंदू रयतेच्या स्थितिरीतीची माहिती मला विशेष असणार हें सांगायला पाहिजे असं नाहीं. शिवाजीनं या रियासतीविरुद्ध जे पुंडावे चालिवले आहेत ते त्याला इतक्या जोरकशीनं मोठमोठ्या पातशाहितीशीं दावे बांधून कसे चा-

लवतां येतात याबद्दल रणदुल्लाखान यांनीं आतांच मोठें आश्चर्य दाखविलें व त्या शिवाजीवर कांहीं तरी महत्कृपा असावी असाही संशय प्रकट केला; पण यावत् हिंदुमात्राची तर आजमितीला खरोखरच अशी पूर्ण खातरी होऊन चुकली आहे, कीं त्या पुरुषावर ईश्वराची फार फार मेहेरनजर आहे.

**पीरसा०**—अजी, काफर हिंदूपें खुदाकी मेहेरनजर कैसी होगी? वो तो बूदपरस्त है!

**बादशहा** ( वजीरास )—बस्स, ये गुफ्तगू हम नहीं चाहते.

**वजीर**(पीरसाहेबास थांबवून मुरारपंतास)—मुरारपंत, आपकी कैफियत चलने दो.

**मुरारपं०**—फार काय सांगावं, तो प्रत्यक्ष ईश्वराचा एक अवतारच होय अशीही कैक लोकांची त्याच्याविषयीं समजूत असून जेथें त्याचा शब्द तेथें आपलें शिर देण्याला ते तयार झाले आहेत. दोनच उदाहरणें मी आपल्याला सांगतों ह्मणजे बस्स आहेत. शिवाजीला आपल्या किल्ल्यावर सुरक्षित पोंचतां यावं ह्मणून त्याच्या मागं लागलेल्या सिद्दीजोहरास ज्यानं एका खिंडींत मोठ्या शौर्यानं

आडवून धरलं, आणि प्राणान्तिक वेदना होत इतका स्वतः घायाळ झाला असतांही आपला धनी सुरक्षित पोंचल्याची वार्ता ऐकली तेव्हांच, ज्यानें आधीं आपला प्राण व नंतर ती खिंड सोडली असा तो वाजी देशपांडे, त्याचप्रमाणें रुस्तुमखांच्या तंबूंत जाऊन त्याचा वध करून शिवाजीला परत येतां याव ह्मणून त्याच्या तंबूभोंवतीं असलेल्या झगझगीत निखाऱ्याच्या खाईंत बेलाशक आडवा पडणारा तो जिववामहाली,* असलीं विलक्षण स्वामिनिष्ठ, शूरसाहसी पुरुषरत्नं जीं महाराष्ट्रांत उत्पन्न होताहेत तीं शिवाजींत तसाच कांहीं लोकोत्तरपणा असल्यावांचून होत नाहींत हें उघडच होय. आतां आपल्या दृष्टीनं तो दगेवाज, बेइमानी, बदमाष कसाही असो, तथापि लोकांचा त्याच्यावर असा देवाप्रमाणें दृढविश्वास बसण्यासारखं धैर्य, शौर्य, साहस,

---

* ही आख्यायिका ऐकण्यांत पुष्कळ आहे; पण यांतील व्यक्तींचीं नांवें कोठेंच मिळेनात. तेव्हां हीं येथें कल्पित घालावीं लागलीं. आफ्जुलखानाशीं झालेल्या झटापटींत जिववा महालीची स्वामिनिष्ठा प्रसिद्ध असून त्यावरून "जवळ होता जिवा ह्मणून वांचला शिवा" अशी एक ह्मणही प्रचारांत आहे.

औदार्य, पुण्यशीलपणा वगैरे अनेक सद्गुणही त्याच्या मध्यें विशेष आढळून येतात, याबद्दल हुजूरची मी खात्री करून द्यायला पाहिजे असें नाहीं.

**बादशहा**—सच है. ये सिवाजीकेलिये मै जो गौर करताहूं तो पहिले मेरा लहू गरम हो जाय ऐसी बदमाषी उस्में नजर आती है; तो भी मेरे दिलमे उस्केवास्ते मोहबत पैदा होनेकी सखावती भी उस्मे बहोत भरी है. देखो—

**(४) बदी अपने महजबकी करता नही॥ महेजिदकुभी वो बिगडता नहीं ॥ मिले जंगमें जो कुई औरतां॥ इफाजतसे वो उनकु है भेजता ॥ खुबीयेंभि है उस्मे ऐसे बहोत॥ उसे दिल हमाराभि खुष होके जात ॥**

**मुरारपं०**—आतां, लोकांची जी कल्पना झाली आहे, त्याप्रमाणें ह्मणजे मुसलमानांचें आज राज्य बुडून शिवाजी मोटा हिंदुपदपाच्छाह होणार ही गोष्ट खरी होण्यासारखी असो वा नसो; या सर्व ईश्वराधीनच्या गोष्टी ! परंतु अशा प्रकारच्या ज्या कल्पना लोकांच्या मनांत उद्भवल्या आहेत व त्यामुळें ते अनेक प्रकारच्या शौर्यसाहसास बेशक प्र-

वृत्त होऊं लागले आहेत, त्याकडे आपण दुर्लक्ष मात्र करतां कामा नये. यांत मोठाच धोका आहे. शिवाजीविषयीं लोकांच्या कल्पना खऱ्याच होतील, असं आपण घेऊन चला, हें मी आपल्याला सांगत नाहीं. मात्र त्याच्याकडे बारकाईनं पूर्ण लक्ष द्या असं आपल्यास मला या बैठकीला सुचवायचें आहे. प्रसंगविशेषीं अशा प्रकारचे जे उन्माद लोकांमध्यें प्रकट होतात, ते केवळ जेरजबरीनं दडपूं पहाणं हें कधींही निर्भय नसतं हें मला आज विशेष स्पष्ट सांगितलं पाहिजे. मीं आधींच आपल्याला विनंति केली आहे कीं, हिंदूंच्या तरफदारीचे शब्द आज माझ्या तोंडांतून निघतील तरी आपण मला त्यांचा पक्षपाती आणि या तख्ताशीं बेमान असा मात्र समजूं नका. त्या विनंतीची पुन्हा आठवण देऊन मी हात जोडून हुजुरास आग्रहानं सुचवतों, कीं या रियासतीपुढें हल्लीं चहूंकडून इतकेंच नव्हे तर जसें बाहेरून तसेंच आंतूनही अनेक दुष्ट प्रसंग 'आ' करून उभे राहिलेले दिसताहेत, तेंव्हां अशा स्थितींत आज शिवाजी भोंसल्याच्या दांडगाईबद्दल त्याच्या पारिपत्यास उद्युक्त होऊन असंख्य लोकांचीं मनं दुखवणं हें बिलकुल फायदेवाईक होणार नाहीं. आजच्या

स्थितींत हा मार्ग अशक्य मानला नाहीं तरी निःसंशय आपल्याला घातक आहे, हें मी खात्रीनं सांगतों. शिवाजीच्या गुन्ह्याबद्दल केवळ संशयावरून त्याच्या बापाला गफलतीनें पकडून या रियासतीच्या एवढ्या इभ्रतदार सरदाराची जी कांहीं बेहुर्मत झाली, ती तर मोठीच गोष्ट आपल्या हातून घसरली असं मला स्पष्ट सांगावं लागतं याची माफी असावी. शिवाजी मोंगलांशीं एक होतो याचं कारण हेंच आहे. पूर्वींपासूनच जर त्याच्या बदफैली वर्तणुकीकडे कांहींशी रहीमनजर ठेवून त्याला आपलासा करून घेण्याचा यत्न झाला असता तर दिल्लीकरांपेक्षां विजापूरकरांचाच अभिमान बापाच्या संबंधानं तरी त्याला विशेष वाटला असता यांत विलकुल संशय नाहीं ! मी म्हणतों, कीं अझून ही गोष्ट सांवरून घेतां येण्यासारखी आहे. आज त्याच्यासारखा जोरकष व सर्व सामुग्रीनं सिद्ध असा दोस्त या रियासतीच्या बचावासाठीं, आपल्याला जरूर पाहिजे आहे. तेव्हां हुजूरनीं शहाजी राजे यांना बंदमुक्त करून झाल्या गेल्या अपमानाबद्दल त्यांची पूर्ण दिलसफाई करावी, आणि मग खुद्द त्यांचीच रवानगी शिवाजीकडे करून त्यांच्या मार्फतीनं शिवाजी भोंसल्याशीं सल्ला घडवून

आणवावा. हल्लींच्या प्रसंगीं याहून आपल्या वचावाचा विनतोड उपाय कोणाला सुचेल असं मला वाटत नाहीं. आपलं इमानी कर्तव्य जाणून जें सुचवावंसं वाटलं तें या बंद्या सेवकानं फर्मावलं आहे. मर्जीस येईल त्याप्रमाणं त्याचा विचार करायला हुजूर मुकत्यार आहेत.

**बादशा०**—वाहवा, वाहवा! मुरारपंत, ये तुमारी सल्ला हमकू माकूल है!

**पीरसा०**—( एकीकडे ) ऐसा बदसल्ला देनेवाले काफरका खुदा खानाखराव करें!

**बादशा०**—( वजीरास ) अच्छा, तो अव शहाजी राजेको कैदसे रिहाई करके उनके दरजाके लायक इज्जतसे येही दरबारमें ले आना. मुरारपंत, खुद्द तुमही जाना.

**मुरार०**—जी हुजूर. ( जातो. )

**पीरसा०**—ये काफर बम्मनके मूंसे जो बदबोंकी हवा आई इस्से ये सव मिजलस नापाक हुई! लाहोलवलाकुवत, इल्ला बिल्ला, हिल्ल अली यिल्ल अजीम!

**बादशा०**—हां हां, पीरसाहेब, उनकेउपर आप इतनी नाराजी ओर खपगी न कीजे. उने जो मसलत कही वो इसी वख्त मुनासव है.

**पीरसाहे०**—अजी हुजूर जरा गौर तो कीजिए. मरगट्टा सिवाजीसरीका वदवख्त और वदमाष दुष्मनोके पास कदमवोसी करना ये क्या मुनासव है ! आजदिनतक करोंडो हिंदू कत्तलकर उनके सिरोंके गंज वनादिए तव ये दख्खनमें इस्लामी रियासते वनीगई है. उस जमानेमें हमलोगोंमें जो ताकद या शोर था उस्से हाल कुच कमजोर हुवा ? या ओ काफरोंकी ताकद वढगई है ?

**वादशा०**—ये कुचभी हो, लेकिन वख्तपरभी नजर देना तो जुरूर होता है ?

( शहाजीराजे व दिवाण मुरारपंत येतात. )

**वजीर**—अजी राजेसाहेव, जिस वातोंके सववसे आप वडे गुन्हागार होके आपकु आजतक खामखा वडी तकलीफ उठाना पडा उसमें खुद्द तुमारा कुच कसूर नहीं ये हुजूरकी खातर जमा हो चुकी है. और इसलिये अव हुजूरने आपकेउपर मेहेरवानी किई है. आज दिनतक जैसे नेकनामीसे हुजूरके खिदमतमें आप वडे वडे वहादरीके काम करते आए वैसाही आगे करना चाहिये.

**वादशा०**—सिवाय जो वात हो चुकी इसकेवास्ते आप दिलमें फिकभी न करो.

**शहाजी**—खाविंद, सेवकाकडून या तख्ताची सेवा किती नेकदारीनं झाली आहे हें सर्व हुजूर रुजू आहेच. त्याची उच्चारणा करावी असं नाहीं. लेक अफीर झाला झणून साहेबांचे आह्मी गुन्हेगार ठरलों आणि जो देह आजपर्यंत या रियासतीचे हिताकरतां व वृद्धीकरतां झिजला त्याची या वयांत होऊं नये अशी शोभा विनाकारण झाली ! असो, दुर्दैव आमचें. यांत दुसऱ्याकडे बोल काय? आतां हुजूरची रहीमनजर होत आहे, तर आपलें अन्न खाऊन आपले विरुद्ध तरवार बांधून हरामखोरी करणें नाहीं हें जें पहिल्यापासून सांगत आहों तेंच प्रमाण.

**वजीर**—राजेसाहेब, अब जो कुच हुजूर आपकों फर्माते है उस बातसे देखो आप निहायत खुषही होकर वो जरूर मंजूर करोगे.

**शहाजी**—वजीरसाहेब, हुजूरच्या हुकमापुढें आमच्या खुषीनाखुषीचा विचार आह्मी कधीं ठेवलेला नाहींच. प्रत्यक्ष आमच्या लेकाच्या पारिपत्यासाठीं जाण्याचा हुकूम होईल तरी सुद्धां त्यांत आह्माकडून कसूर होणार नाहीं.

**बादशा०**—शहाजीराजे, आपकू ये फर्माया जाता है

के हमारे तरफसे तुमारा फर्जंद सिवाजी उनके मुलाकातकू आप चले जाना; और जिस तरकीवसे उनकी हमारी आजदिनसे दोस्ती वनी रहे ऐसा करो. आजतक उन्ने जितना मुल्क अपने कावूमे करलिया है वो सव उसीकु वक्षिस किया है. सिवाय इसके औरभी दिलमे कुच अर्मान रहा होय, तो उसकाभी दरवारमें गौर किया जायगा. मगर हरसूरतसे उनका हमारा मेल हो जाय और वख्तपर मोंगलसे जो लढनेका मोका पडे तो ओ हमकू मदत दे ऐसी तरकीव तुम किसी तरेसीवी करो.

**शहाजी**—( एकीकडे ) अहाहा ! त्या ब्राह्मणाच्या वचनाप्रमाणं पुत्राच्या माझ्या वियोगाचा तो दिवस सुयोगच ठरला !—

( साकी ) **दुःख दिलें वहु त्यानें परि नच कर्तव्या चुकवीलें ॥ पुत्रासहि त्याच्या ईर्षेच्या दिसतें समिपचि नेलें ॥ प्रसंग भेटीचा ॥ आतां इष्ट किती साचा ॥**

—( उघड ) हुजूरच्या इच्छेप्रमाणं सर्व कांहीं घडवून आणण्याची तजवीज होईल.

**बाद०** (वजीरास)—अच्छा, वजीर अब शहाजी राजेकु खिलत देकर रुकसत करीये.

( शहाजीस पोषाख देतात. एकीकडे नाच गाणें चालतें. )

**भाल० चोप०**—दरबार बरखास्त !

( पडदा पडतो. )

---

[**प्रवेश,** २ रा—**स्थळ,** शिवाजीचे राजवाड्याची नजरबाग—**पात्रें,** हिरा व गजरा आपसांत कुजबुजत येतात. ]

**गजरा**—चल, बोलूं नकोस.

**हिरा**—अग, खोटं नव्हे. आतांशा तिच्याच नादीं महाराज आहेत. उगीच का त्यांना तुझ्या सईबाईसाहेबांच्या महालाकडे यायला फावत नाहीं तें !

**गजरा**—किती तरी चावट आहेस ग तूं. त्या हैवतरावाच्या संगतीनं शिकलीस वाटतं असला चहाटळपणा करायला. महाराज ह्मणजे प्रत्यक्ष धर्ममूर्ति. एखाद्या परक्याची तर राहिलीच, पण शत्रूची देखील लढाईंत स्त्री जिंकून आणली, तर तिच्याकडे किंचित् सुद्धां वांकडी नजर त्यांची नसते. त्या कल्याणच्या काजीची मुलगी, प्र-

त्यक्ष रंभेलाही लाजविणारी अशी सुस्वरूप होती ह्मणतात. पण तिला महाराजांनीं आई ह्मणूनच मोठ्या सन्मानानं परत लावून दिली. अशी ज्यांची ख्याती ते काय, ह्मणे कोणा एका सुंदर स्त्रीवर भाळले आहेत आणि इतकंच नव्हे तर तिच्या नवऱ्याला दूर करून आपण मोठ्या समारंभानं तिच्याशीं लौकरच आतां लग्नही करणार आहेत! चल, असले शब्द वोलायला तुझी जीभ तरी कशी वळली कोण जाणं !

**हिरा**—आन् मी ह्मणत्यें ही गोष्ट खरी, असं तुझ्या प्रत्ययाला आणून दिलं तर ?

**गजरा**—मग तूं ह्मणशील तें मी ऐकेन. पण नकोच. असली गोष्ट खरीही असायला नको, आन् तिचा मला प्रत्ययही पण यायला नको.

**हिरा**—आपण ह्मटल्यानं कां ती खोटी होणार आहे? पण हें वघ गजरे, खरंच पुसशील तर गडे ही गोष्ट तुला जशी खरी व्हायला नको आहे किंनई, तशीच मला पण ती खोटीही व्हायला नको आहे वरं का !

**गजरा**—वः, मग तुझी वासना महाराजांच्या संवंधानं

चांगलीच आहे ह्मणायची ! समजल्यें, हल्लीं पावसाळ्याचे दिवस, सर्व लष्कर आपापल्या ठाण्यांत विश्रांति घेत आहे, असं असतां तुझ्या हैबतरावाला तेवढंच जरूरीच्या एका कामगिरीवर महाराजांनीं याच वेळीं दूर पाठिवलं आहे ह्मणून का त्यांच्या विरुद्ध असलं भलतं कुभांड रचून त्याचं तूं हें उसनं फेडीत आहेस ? खूप. पण संभाळ वरं. हें जर का महाराजांच्या कानावर गेलं तर तूं आऊसाहेबांच्या अति मर्जींतली ह्मणून कांहीं तुला क्षमा होणार नाहीं.

**हिरा**—न होऊं दे कशी. पण मी तुला आतां असं विचारतें कीं, सईबाईसाहेबांच्या महालाकडे आतांशा महाराज येतात तरी कितीसे ?

**गजरा**—नाहीं त्यांना फारसं यायला होत. वरं मग ?

**हिरा**—अग, याचं कारण काय असावं हें तूं मला सांगशील ?

**गजरा**—हो. या महाराष्ट्रभूमीला त्या मेल्या यवनांच्या हातून पुरती एकदां सोडविण्याचा त्यांना जो निदिध्यास आहे हेंच त्याचं कारण.

**हिरा**—वरं, परवां वाड्यामध्यें काशीच्या पंडितांक-

हून आलेल्या पत्रावद्दल आमच्या आऊसाहेव आणि शास्त्रीवुवा यांच्यांत काय वोलणं चालल होतं हें तुला आठवतं का ?

**गजरा**--अग, न आठवायला काय झालं ? अशा रीतीनं सोडवलेल्या या मग महाराष्ट्रभूमीचे छत्रसिंहासनाधीश्वर असे स्वामी आपले महाराज व्हावेत या गोष्टीला काशींतल्या पंडितांची संमति मिळाली, हेंच कीं नाहीं ?

**हिरा**--मग तर आतां तूंच सांग, कीं महाराष्ट्रभूमि हीच कोणी एक स्त्री, आन् ते यवन पादशाहा तिचे हल्लींचे स्वामी, त्यांना एकीकडे करून आमचे महाराज स्वतः आतां तिचे पति मोठ्या थाटानें होणार, ह्मणून मी जर ह्मटलं तर तें खरं कीं खोटं. आन् यावद्दल महाराज मजवर काय ह्मणून रागावतील ?

**गजरा**--वः, गडे तूं तर एक हा उखाणाच तयार केलास ! ( चपापून ) अग पण, महाराज आन् वाईसाहेव आज या वागेंतच आहेत, नाहीं का ? होय. ते पहा, आत्तां त्या ताटव्यांच्या पलीकडन गेले. त्यांनीं आपलं वोलणं ऐकलं तर नसेल ना. चल वाई, आतां पुढें जायला

मला भीति वाटते. आपण वागेच्या दाराशीं जाऊन उभ्या राहूं. ( जातात )

---

[**प्रवेश ३ रा—स्थळ,** तेंच.—**पात्रें,** शिवाजी व सईबाई.]

**शिवाजी**—आतां तर गेली ना मनांतली शंका ?

**सईबाई**—मला ती आली यांत कांहीं नवल नाहीं. पण इथें सुद्धां त्या हिरेचं तें मोघम बोलणं स्पष्ट होईपर्यंत मुद्रेंत किती चलबिचल झाली होती ती माझ्या ध्यानांत आली पण ?

**शिवाजी**—अग,—

( ५ ) **साक्ष जरि दे शुद्धत्वाची चित्त आपुलें तें ॥ कर्म होत न कळत त्याचें ज्ञान त्यास नसतें ॥ दर्पणींच निजरूपाचें ज्ञान जेंवि होतें ॥ कर्म अविदित इतरांकडुनी कळत आपणातें ॥**

—याकरतांच तर तिचं तें सर्व भाषण ऐकत मुद्दाम आड उभा राहिलों होतों. एकंदरींत हिरा मोठी चतुर खरी.

**सई०**—उगीच का त्या आपल्या हैवतरावाला तिनं

अगदीं सामान्य दर्जातनं आज इतक्या योग्यतेला आणलं तें.

**शिवा०**—ह्मणजे? त्याच्या योग्यतेशीं हिचा काय संबंध वरं?

**सई०**—आपल्याला नाहींच का माहीत? इच्याच गांवचा तो. लहानपणींच दोघांच्या आईवापांनीं यांच्या लग्नाचं अगदीं पक्कं ठरवून टाकलं होतं. पण ही हिरा पुढें इकडे सासूबाईपाशीं वाढली त्यामुळं हिच्या ईर्षा आणि कल्पना फारच वेगळ्या झालेल्या. तिला का परत गांवीं जाऊन तशा स्थितींत त्या मनुष्याशीं लगीन करून राह्यचं आवडतं? तेव्हां मग तिन आपल्या आईवापांचं मन न मोडावं ह्मणून त्याच्याशीं लग्न तर केलंच, पण आपल्याही ईर्षा पूर्ण व्हाव्यात यासाठीं त्या मनुष्याच्या मनांत मग इकडच्या आश्रयाला येऊन हळु हळु मोठेपणाला चढण्याची एकेक कल्पना मोठ्या चतुरपणानें भरवून दिली. आतां असा तो वाढतां वाढतां एकदां सरनोबत झाला ह्मणजे तिची सर्व हौस पूर्ण होणार आहे.

**शिवा०**—वरं तर, तिनं आपल्या चतुरपणाचा प्र-

त्यय ज्या अर्थी आतां मलाही प्रत्यक्ष आणून दिला आहे, त्याअर्थी तिची ही हौस लौकरच पूर्ण झाल्यावांचून राहणार नाहीं. तें असो. वरं पण मघां मी विचारलेला प्रश्न तसाच्च राहिला.

**सई०**—हें काय बाई, असल्या मसलतीचा अर्थ मला तो काय समजणार वरं; अहो—

**(६) बायकांना आह्माला तें ॥ राजकारण काय हें कळतें ॥ न्यूनपूर्ण घरांतील दिसतें ॥ योग्य नसतों अशा मसलतींतें ॥**

**शिवा०**—अग पण आतांच जिच्या चतुरस्रपणाची एवढी तारीफ केलीस ती हिरा तूं ह्मणतेस तशी या बायकांच्याच वर्गांतली होय ना ?

**सई०**—पण सर्वच्च का तशा असतात ? अशा चतुर थोड्या.

**शिवा०**—असतील. पण ईश्वरकृपेनं आमच्यापाशीं एकंदर माणसांचा जो संग्रह आहे तो अशा या थोड्यांचाच्च होय.—

(दिंडी) **वघुनि वेंचक एकेक अशीं रत्नें ॥ माळ गुंफावी जशी ती प्रयत्नें ॥ तशीं दुर्मिळ गुणवंत जीं जगांत ॥ असति अमुच्या माणसें संग्रहांत ॥**

**सई०**—आपल्यापुढें वोलायला मी का टिकेन ?

**शिवा०**—मग सांगेनास एकदम. उगीच आढेवेढे कां ? तिकडे वावांच्या सुटकेकरतां हल्लींच्या प्रसंगीं कोणतं वर्तन मला उक्त आहे वरं ?

**सई०**—हें पहा, मला तर असं वाटतं कीं, आपल्यामुळं तिकडे मामंजी घोर संकटांत पडले आहेत ही गोष्ट सगळ्यांनाच मोठ्या दुःखाची तर खरीच; पण मी ह्मणत्यें,–

(७) **'देश मुक्त करूं' हें व्रत तुह्मि घेतलें ॥ तेंच सकल मोहपाश खचित तोडिले ॥ देश० ॥ प्रेमाचें स्थळ विशेष नाहिं ठेविलें ॥ यच्चावत् स्वजन तेच आप्त लेखिले ॥ यत्न तदुत्कर्षक हें पुण्य मानिलें ॥ यापायीं स्वसुख तेंहि सर्व त्यागिलें ॥ देश०॥**

**शिवा०**—अग पण बाबांचे कष्ट ऐकून मनाला स्वाभाविक होणाऱ्या दुःखाचं हेंच का समाधान? अग—

(साकी) **पिता स्वर्ग तो पिता स्वधर्मचि पिताहि तप तें श्रेष्ठ ॥ पितर जरी संतुष्ट तरिच त्या देवदेवता तुष्ट ॥ शास्त्र वदे ऐसें ॥ उपेक्षूं वचन सखे कैसें ॥**

—तेव्हां त्यांच्या मुक्ततेचा असा कांहीं मार्ग नाहींच का?

**सई०**—नाहीं कां? तो आपल्याला नवीन का शोधून काढायचा आहे?—

(८) **मला मुक्ततेचा दिसे मार्ग हाच ॥ अधिक शौर्याग्निला चेतवाच ॥ मला० ॥ प्रखर तुमचा जसा होय विक्रमरवी ॥ यवनमुखचंद्र निस्तेज समजा ॥ शिथिल तत्सामर्थ्य होय निःसंशयें ॥ लागल्यावरि अशी तीव्र आंच ॥ मला० ॥**

**शिवा०**—अग पण आज बाबा विजापुरकरांच्या

अटकेंत आहेत, तेव्हां आह्मी विजापुरकरांना असाच उपद्रव देत राहूं तर त्या मानानें तिकडे बाबांनाच त्रास होणार आहे.

**सईबा०**—त्याला मग गोकुळांत असतां श्रीकृष्णानें कंसाशीं कसं वर्तन ठेवलं होतं हें ध्यानांत आणावं ह्मणजे झालं—

**(९) आइबाप बंदिंत ह्मणुनी कृष्ण काय भ्याला ॥ अल्पवयिंही कंसा त्यानें हात दाखवीला ॥ काय त्याचा परिणामचि तो इष्ट नाहिं झाला ॥ आइ० ॥**

**शिवा०**—(स्वगत)—अहाहा! उगीच का एक सद्गुणी स्त्री ह्मटली ह्मणजे तिच्यांत अनेक विभूतींचा अंतर्भाव मानला आहे तो?—

**(१०) हितकथनीं मंत्रि होते सेवेला किंकरी ॥ जपण्याला पतिस जैसी मायचि ही दूसरी ॥ मित्र तशी समविभागी सुखदु:खीं**

होय ही ॥ संसारश्रम सहाया जणुं आहे ही मही ॥

—( उघड ) प्रिये, शाबास !—

(११) परिसुनि सखे असे सुविचार ॥ आदर करुं वद काय तुझा तरि ॥ प० ॥····

**सईबा०** ( विनयानें )—

········पति संतुष्ट अह्माविषयीं जरि ॥ काय दुजा त्याहुनि सत्कार ॥········

**शिवाजी** ( आलिंगून )—

···········चुंबूनिच मग सत्कारिन तुज ॥ न करिं सखे याचा प्रतिकार ॥ आदर० ॥

( गजरा धाईनें येते. )

**गजरा**—महाराज, विजापुराकडे आपण पाठविलेले हैवतराव हे आत्तांच आले. हा लखोटा त्यांनीं दिला आहे.

**शिवा०**—( पत्र पाहून ) काय ? खुद्द बाबांचंच पत्र हें ! अहाहा ! ते बंदमुक्त झाले इतकेंच नव्हे, तर विजापुरकरांच्या तर्फे आमच्याशीं सल्ला करायला स्वतःच ते इकडे यायलाही निघाले आहेत ! प्रिये,—

(१२) इतरांचा ऐकून मंत्र मग त्यापरि वागावें ॥ तेंच फल त्याचें लाभावें ॥ तेंहि इष्ट कीं अनिष्ट आधीं कोणीं सांगावें ॥ जसें तें मिळेल सेवावें ॥ सखे तुझा परि मंत्र ऐकुनी पळहि न लोटावें ॥ तोंच फल इष्ट पहा यावें ॥

**सई०**—पण यावद्दल माझी स्तुति कशाला?—

(१३) काय मी तें अधिक असें वदल्यें ॥ काय मी० ॥ क्रम अपुलाच ॥ असे कधींचाच ॥ केला मीं त्याचाच ॥ असा निर्देश॥ त्याचें सर्व श्रेय तें इकडे ॥ मला नव्हे ॥

**शिवाजी**—अहाहा! बाबांची आतां भेट झाल्यावर काय काय गोष्टी तरी मला करायाच्या आहेत.—

(१४) अपराधांची आधीं त्यांना क्षमाचि मागेन ॥ ईशकृपें वैभव आलें तें दावुनि

**तोषविन ॥ ह्मणवुनि घेइन धन्य पहा कीं मी त्यांचेकडुन ॥ होइन गे कृतकृत्य तयांच्या आशीर्वचनानं ॥**

—( दासीस ) अग ही वातमी अगोदर तिकडे आईसाहेवांकडे जाऊन कळीव वरं ?—अथवा नको, मीच तिकडे येतों.

**गजरा**—महाराज, आऊसाहेवांकडे हिरा मघांच धांवत गेली सुद्धां. अशी आनंदाची वातमी अगोदर कळवून वक्षिस मिळवण्याची संधि ती का फुकट दवडणार ?

**शिवा०**—अग या वेळीं सर्वांनांच संतुष्ट करूं चला—

( १५ ) **सुदिन उगवला ॥ जसा आज हा मला ॥ जसा० ॥ आनंदप्रद अशा या समयीं ॥ अभीष्ट देउनी सकलांला ॥ तोषवूं चला ॥ घडो लाभ त्यांजला ॥ अहा लाभ०॥**

( पडदा पडतो. )

# अंक पांचवा.

[ **प्रवेश १** ला.–**स्थळ**, जेजुरी.–**पात्रें**, मोरोपंत (?)वे व शहाजीचे कारभारी त्र्यंबकराव हणमंते. ]

**मोरोपंत**—दिवस असे पावसाळ्याचे असतां आपण (?)वजापुराहून फारच लौकर आलां ह्मटलं पाहिजे. मजला मोटमोठ्या करा‌व्या लागल्या असतील.

**त्र्यंबक**—तें कांहीं विचारूं नका. एकाद्या अति निकडीच्या मोहिमेवर सुद्धां शहाजी राजे इतक्या झपाट्यानें कधीं गेले नसतील. वाटेंतले पांच चारच मुक्काम, पण ते सुद्धां त्यांना अति जड वाटले. उतारवय, त्यांतून नुकतेच क्लेशही फार झालेले, नाहींपेक्षां एक मांड ठेवून चढे घोड्यानिशीं ते यापूर्वींही एथें केव्हांच येऊन पोंचते. बरोबरच आहे—

( साकी ) **पातशहाची आज्ञा त्यांना पुढें ओढिती झाली ॥ पुत्रभेटिची उत्कंठा अति मागुनि तैशी ढकली ॥ दुजोर हा ऐसा ॥ संपवि मार्ग ह्मणीं न कसा ॥**

—त्यांतून या जेजुरीपर्यंत तुह्मी पुढें येऊन आमची मजल बरीच कमी केलीत.

**मोरोपंत**—अहो, जशी आवासाहेबांना, तशीच हा कीं आमच्या महाराजांनाही या भेटीची उत्कंठा काय ? त-होती ? ते ह्याही मुक्कामापुढें एकटेच आवासाहेबां भेटीला निघाले होते. पण जवळच्या शास्त्रीमंडळी सांगितलें, कीं वडिलांच्या भेटीला ज्या अर्थी वरींच वर्हे-लोटलीं आहेत त्या अर्थीं आतां ही भेट एखाद्या देवतेच्या सन्निध कांहीं विधिपूर्वकच झाली पाहिजे. तेव्हां निरुपाय होऊन त्यांना इथें हा मुक्काम करावा लागला.

**त्र्यंबक०**—शिवाजी महाराजांनीं खरोखर मोठीच ही कीर्ति संपादन केली. पहिली यःकश्चित् पुणें महालाची जहा-गीर ती काय, पण आज जवळजवळ एक कोटीचा मुलूख त्यांनीं आपल्या सत्तेंत आणला आहे. अगणित किल्ले बांधले; मोठे मी मी ह्मणविणार बादशाही अमीर, पण त्यांच्याशीं केवळ कोंकणी, मावळी, अडाणी, घोंगडेवीर अशांच्या-कडून टक्कर देववून ते पार गर्दिला मिळवून दिले.

**मोरोपं०**—त्र्यंबकराव, आमच्या महाराजांचे एकेक गुण काय सांगूं हो तुह्माला. मसलतींत अतिशय खोल; शौर्य साहस यांत सर्वांच्या पुढें; कशाही विकट प्रसंगीं युक्ति काढण्यांत यांच्या कल्पनेची धांव विलक्षण; मुल्की असो किंवा लष्करी असो, शिस्त कशी अगदीं करारी!